कृषीवल
रायगड, सोमवार, दि. २८ ऑक्टोबर २०२४
किंमत ४ ₹

## वांद्रे रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी

**मुंबई :** वांद्रे टर्मिनसच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली. या झालेल्या चेंगराचेंगरीत नऊ प्रवासी जखमी झाले आहेत. वांद्रे रेल्वे स्थानकावरुन गोरखपूरकडे जाणाऱ्या एक्स्प्रेसमध्ये चढताना प्लॅटफॉर्मवर ही चेंगराचेंगरी झाली. यामध्ये दोन प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दिवाळीच्या सुट्टीमुळे उत्तर प्रदेश, बिहारकडे जाणाऱ्या मेल-एक्स्प्रेसे गाड्यांना मोठी गर्दी आहे. रविवारी पहाटे ५ वाजून १० मिनिटांनी बांद्रा टर्मिनसहून गोरखपूर एक्स्प्रेस सुटणार होती. या एक्स्प्रेसने प्रवास करण्यासाठी प्रवासी रात्रीपासूनच स्थानकात आले होते. एक्स्प्रेस प्लॅटफॉर्मला लागताच ट्रेनमध्ये चढण्यासाठी प्रवाशांनी एकच गर्दी केली.

## भीषण अपघातात पाच ठार

**नवी दिल्ली :** मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यात अवजड वाहनांच्या वेगवेगळ्या अपघातात पाच जण ठार झाले आहेत. तर, १२ जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलिसांनी रविवारी (दि.२७) दिली. याबाबत अधिक माहिती अशी की, रविवारी सकाळी सातच्या सुमारास बैतुल-परासिया रोडवरील हनुमान डोलजवळ ट्रॅक्टर ट्रॉली पलटी झाल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. तर १२ जण जखमी झाले. यासोबतच बैतूल-अथनेर रोडवर ट्रक आणि दुचाकी यांच्यात झालेल्या धडकेत दुचाकीस्वारासह तिघांचा मृत्यू झाला. शनिवारी रात्री उशिरा १२ वाजता हा अपघात झाला. मयत झालेले तिघेही फर्निचरचे काम करून घरी परतत होते.

# धनुष्यबाणाला ताप, कमळाला मनस्ताप

माधवी सावंत
| अलिबाग |

विधानसभेच्या जागावाटपावरून तीन प्रमुख नेते सोडून कोणीही बोलू नये, असे वारंवार सांगितले जात असतानाही तिन्ही पक्षांकडून या आदेशाचे उल्लंघन करणे सुरूच आहे. याचा प्रत्यय अलीकडेचे शिंदे गटाच्या आमदारांनी केलेल्या वक्तव्यावरुन आला. सुरुवातीपासूनच मित्रपक्षात असतानाही शत्रूपक्षाची भूमिका पार पाडणारे शिंदे गटाचे आ. दळवी व अपक्ष उमेदवार तथा भाजपचे उपजिल्हा प्रमुख दिलीप भोईर यांच्यातील वाद सर्वांनाच ज्ञात आहे. अशातच भाजपने

- **नेत्यांच्या आदेशाचे उल्लंघन**
- **भाजपचा बदला घेण्याचे दळवींचे संकेत**

युतीधर्म पाळला नाही तर पेण, उरणमध्ये भाजपला जबरदस्त फटका बसेल, असा संकेतही त्यांनी दिला आहे. त्यामुळे एकप्रकारे भाजपला ब्लॅकमिलिंग करण्याचे काम दळवींकडून केले जात असल्याची चर्चा आहे. तर राज्यात सर्वाधिक आमदार निवडून आलेले असताना भाजप शिंदे गटाच्या पायाशी लोटांगण का घालत आहे, असा प्रश्न जनतेने उपस्थित केला आहे. अलिबाग-रोहा-मुरुड मतदारसंघात सुरु असलेल्या महायुतीमधील वादामुळे महायुतीचे

पान २ वर

### पेण, उरणमध्ये भाजपला पाडणार?


छोटम अर्थात दिलीप भोईर यांना राजकारणाची परिभाषा माहीत नाही. त्यांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही. महायुतीने युतीधर्म पाळला नाही तर पेणमध्येदेखील हा धर्म पाळला जाणार नाही. पेणमध्ये ४० ते ४५ हजार इतकी मते आहेत. त्यामुळे पेण, उरणमध्येही शिंदे गटाचे कार्यकर्ते फटका देतील, हे भाजपला जमणार आहे का? असा धमकीवजा सल्ला दळवींनी देत कर्तृत्व सिद्ध करण्याचे आवाहन केले.

### भाजपचे शिंदे गटापुढे लोटांगण?

आता शिंदे गटाकडून आलेल्या धमकीला भाजपप्रणित अपक्ष उमेदवार दिलीप भोईर घाबरणार की गेट आऊट करणार, याकडे साऱ्यांचेच लक्ष लागून राहिले आहे. तर अपक्ष असले तरी ८५ टक्के भाजपचे कार्यकर्ते भोईरांसोबतच असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. त्यामुळे भाजप युतीधर्म पाळणार की दळवींना धक्का देणार हे येत्या ४ नोव्हेंबरला समोर येईल.

### महायुतीत धुसफूस

आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यातील महाविकास आघाडीच्या सरकारला चारीमुंड्या चीत करण्यासाठी एकत्रित आलेल्या शिंदे गट-भाजप-अजित पवार गट या महायुतीचाच वाद चव्हाट्यावर आला आहे. रायगड जिल्ह्यात भाजप शिंदे गटाला धक्का देण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे शिंदे गटावर चांगलीच नामुष्की ओढावली आहे. लोकसभेत शिंदे गट तसेच अजित पवार गटाच्या सहकार्याने भाजपने आपल्या जागा निवडून आणल्या. मात्र, विधानसभेत अंतर्गत भाजपची डाळ शिजली असून, फोडणी कोण घालणार, याकडे जनतेचं लक्ष लागून राहिलं आहे.




## खारेपाटात शेकापच्या प्रचाराचा झंझावात

### चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना मतदारांकडून वाढता प्रतिसाद



| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग, मुरूड व रोहा विधानसभा मतदारसंघातील शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी त्यांच्या प्रचाराला सुरुवात केली आहे. खारेपाटातील कुर्डूस व अन्य भागात शेकापच्या प्रचाराचा झंझावात दिसून येत असून, मतदारांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामध्ये महिला, तरुण व ज्येष्ठ मतदारांचा समावेश असल्याचे चित्र आहे. चित्रलेखा पाटील यांचे ठिकठिकाणी मतदारांकडून जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे.

अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना शेकापकडून अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली. चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यावर कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला आहे. गुरवारी (दि.२४) ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरला. त्यानंतर त्यांनी गावे, वाड्यांमधील प्रमुख कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला, तरुण मंडळी यांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्याशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. पक्षाची ध्येयधोरणे, गोरगरीब, सामान्य व्यक्तीला केंद्रबिंदू मानून पक्षाने कशा पद्धतीने काम केले आहे, याची माहिती मतदारांपर्यंत रुजविण्याचे काम केले जात आहे.

पान २ वर

## गोरगरीबांना केंद्रबिंदू ठेवून काम करणार

### चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांची ग्वाही



| अलिबाग | प्रतिनिधी|

गोरगरीबांना केंद्रबिंदू ठेवून काम करायचे आहे. पक्षाची ताकद विरोधकांना समजली पाहिजे या भूमिकेतून काम करून पुन्हा एकदा पक्षाला अधिक चांगली उभारी देण्याचे काम करू या, क्रिकेटसाठी अद्ययावत असे क्रीडांगण, रखडलेले पाण्याचे प्रश्न, वाड्या वस्त्यांमध्ये 'ताईची सावली' ही घरकुल योजना राबवून गरीबांना हक्काचे घर देण्याचा प्रयत्न शेकाप करीत आहे. आमदार म्हणून अधिवेशनात प्रश्नांची सोडवणूक करण्याबरोबरच क्रीडा, शैक्षणिक अशा अनेक सुविधा या ठिकाणी उपलब्ध करण्याचा मानस असल्याचे चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी सांगितले.

अवेटी रामदासवाडी येथे सुनील म्हात्रे यांच्या

पान २ वर

### भरघोस मतांनी निवडून द्या : ॲड. गौतम पाटील

अलिबाग विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून स्व. ॲड. दत्ता पाटील, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील, माजी आ. पंडित पाटील यांनी प्रतिनिधीत्व केले आहे. जनतेचे प्रश्न त्यांनी सातत्याने अधिवेशनात मांडून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम केले आहे. विधानसभा गाजविल्या आहेत. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या रुपाने तरुण उमेदवार शेतकरी कामगार पक्षाने दिला आहे. चित्रलेखा पाटी या सुशिक्षित व उच्च शिक्षित आहेत. सर्वसामान्यांचे प्रश्न मांडणारे व

पान २ वर

## मविआचे २३९ उमेदवारांची घोषणा

| मुंबई | प्रतिनिधी |

विधानसभेच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून, महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी निवडणूक रंगणार आहे. दरम्यान, महाविकास आघाडीने उमेदवार घोषित करण्यात आघाडी घेतली असून, २८८ पैकी २३९ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. यात काँग्रेसने ८७, शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून ८५ आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून ६७ जागांवरील उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. तर, दुसरीकडे महायुतीकडून २१५ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. यात भाजपने सर्वाधिक १२१, तर शिवसेना शिंदे गटाकडून ४५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून ४९ उमेदवार जाहीर केले आहेत.

## खरसांबळेंना मारहाण करणारे मोकाटच

| अलिबाग | प्रतिनिधी |

कुसुंबळे येथील सामाजिक कार्यकर्ते हेमंत खरसांबळे यांच्यावर गावगुंडांनी जीवघेणा हल्ला केला. परंतु, मारेकऱ्यांविरोधात ठोस कारवाई करण्यास पोलीस अपयशी ठरले असून, शिंदे गटातील राजा केणी यांच्या सांगण्यावरून हल्ला केल्याची माहिती देऊनही पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप खरसांबळे यांनी केला आहे. अखेर त्यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन घटनेची सखोल चौकशी करून मारेकऱ्यांचे फोन कॉल तपासण्यात यावेत, अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

कुसुंबळेतील हेमंत खरसांबळे यांच्यावर मंगळवारी (दि.८) रात्री जीवघेणा हल्ला करण्यात

> **पंधरा दिवसांपूर्वी रात्रीच्यावेळी जीवघेणा हल्ला करण्यात आला. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु होते. दरम्यान, स्थानिक पोलिसांनी १२ तासांनंतर येऊन घटनेची माहिती घेऊन पंचनामा, जबाब लिहून घेतला. राजा केणी या हल्ल्यामागील सूत्रधार आहे, असे सांगूनही पोलिसांनी त्यांचे नाव टाकू शकत नाही, असे सांगून टाळाटाळ केली.**
> **- हेमंत खरसांबळे, पीडित**

पान २ वर

## शेकापमध्ये जोरदार इन्कमिंग

### नांदगाव-दांडे गावातील ग्रामस्थांचा जाहीर पक्षप्रवेश



| कोर्लई | वार्ताहर |

शेतकरी कामगार पक्षाच्या अलिबाग-मुरुड मतदारसंघाच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून मुरुड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील दांडा ग्रामस्थ व महिलांनी शेतकरी कामगार पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून त्यांनी प्रचार दौरा सुरु केला आहे. अलिबाग, मुरूड, रोहा विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चित्रलेखा पाटील यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. शनिवारी मुरुड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील दांडा येथील ग्रामस्थ व महिलांनी शेतकरी कामगार पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. अलिबाग-मुरुड मतदार संघाच्या शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांनी सर्व पक्षप्रवेश करणाऱ्यांचे स्वागत केले असून, आगामी विधानसभा निवडणुकीत याचा निश्चितच चांगला परिणाम दिसून येईल, असे सांगितले.

## काँग्रेस जिल्हाध्यक्षांचा तडकाफडकी राजीनामा

### एकही जागा न मिळाल्याने नाराजी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |



आगामी विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील सात विधानसभा क्षेत्रात काँग्रेस पक्षाच्या वाट्याला एकही जागा सोडण्यात आलेली नसल्याने जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्यासहित पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी तडकाफडकी राजीनामा दिला आहे. रविवार (दि. २७) शेलघर येथे आयोजित कार्यक्रमाला उपस्थित हजारो कार्यकर्त्यांसोबत महेंद्र घरत यांनी संवाद साधला व आपली भूमिका स्पष्ट केली.

यावेळी घरत म्हणाले की, खरे तर लोकसभेच्या निवडणुकीत मावळ लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाला पोषक होता; परंतु उद्धव ठाकरे सेनेने आपला उमेदवार उभा केला व कोकणातील एकही सीट काँग्रेस पक्षाला मिळाली नाही. पुढील विधानसभेत काँग्रेस पक्षाला न्याय मिळेल असा आशावाद होता; परंतु याही विधानसभेत रायगड जिल्ह्यात एकही विधानसभा मतदारसंघ काँग्रेस पक्षाला न सुटल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. आम्ही कोणत्याही पक्षाचे

पान २ वर

## सर्वच राजकीय पक्षांच्या युवा उमेदवारांना प्राधान्य

# रायगडमध्ये युवापर्व

| पनवेल |
विशेष प्रतिनिधी |

**आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांतून निवडणूक लढवण्यासाठी जवळपास सर्वच राजकीय पक्षाकडून उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. राजकीय पक्षांनी घोषित केलेल्या यादीत युवा उमेदवारांना संधी देण्याला प्राधान्य देण्यात आल्याने जिल्ह्यातील राजकारणात यावेळी चुरस वाढल्याचे एकंदरीत चित्र आहे.**

रायगडामध्ये एकूण सात विधानसभामतदारसंघ आहेत. त्यामध्ये पनवेल, उरण, कर्जत-खालापूर, पेण, अलिबाग, श्रीवर्धन आणि महाड-पोलादपूर यांचा समावेश आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक रिंगणात पुन्हा एकदा अदिती तटकरे यांना उतरवले आहे. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार अद्याप ठरलेला नाही. पण, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून या ठिकाणी निवडणूक लढवण्यात येणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्याचे मुख्यालय असणाऱ्या अलिबाग विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाने चित्रलेखा पाटील यांना संधी

पान २ वर



### रायगडात तीन मतदारसंघात महिलांना संधी

**दक्षिण रायगडमध्ये तिन्ही विधानसभा मतदारसंघात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. श्रीवर्धनमधून अदिती तटकरे निवडणूक लढवत आहेत. त्याचबरोबर अलिबाग विधानसभा मतदारसंघात चित्रलेखा पाटील यांच्या रूपाने आणखी एक रणरागिणी मैदानात उतरली आहे. त्याचबरोबर महाडच्या कन्या स्नेहल जगताप यांना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने उमेदवारी दिली आहे. या तिन्ही महिला उमेदवार तरुण आहेत.**

### प्रीतम म्हात्रे उरणमधून रिंगणात

**उरण विधानसभा मतदारसंघात माजी आमदार मनोहर भोईर हे तुलनेत ज्येष्ठ आहे. विद्यमान आमदार महेश बालदी ५७ वर्षांचे आहेत. ते तिसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. या ठिकाणी तिरंगी लढत होणार हे जवळपास निश्चित झाले आहे. दरम्यान, या मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाने तरुण प्रयोग केला आहे. या ठिकाणी प्रीतम म्हात्रे यांना उमेदवारी देत आजी-माजी आमदारांसमोर आव्हान उभे केले आहे. भोईर आणि बालदी यांच्या तुलनेत म्हात्रे हे अधिक तरुण आहेत. परिणामी, तरुणांचा त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.**

## मी पहाटे उठून कुठे जात नाही

### हर्षवर्धन पाटलांची दादांवर खोचक टीका



| पुणे | प्रतिनिधी |

विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यामुळे सध्या राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी प्रमुख लढत होणार आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते हर्षवर्धन पाटील हर्षवर्धन पाटील यांनी अजित पवार यांच्यावर खोचक टीका केली आहे. मी पहाटे उठून कुठे जात नाही, असं म्हणत त्यांनी अजित पवारांना त्यांच्या पहाटेच्या शपथविधीवरून खोचक टीका केली आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी काही दिवसांपूर्वी भारतीय जनता पक्षातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. त्यानंतर हर्षवर्धन पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून इंदापूरमधून विधानसभेची उमेदवारीही देण्यात आली. मात्र, ज्यावेळी हर्षवर्धन पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश झाला त्या दिवशी झालेल्या सभेत हर्षवर्धन पाटील यांनी आपण लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात खासदार सुप्रिया सुळे यांना

पान २ वर

## युगेंद्र पवारांचा प्रचार सुरू

| बारामती | प्रतिनिधी |

बारामतीत यंदा काका विरुद्ध पुतण्या म्हणजेच अजित पवार वि. युगेंद्र पवार असा सामना रंगणार आहे. रविवारी (दि. २७) युगेंद्र पवार यांचे वडिल आणि अजित पवारांचे सख्खे भाऊ श्रीनिवास पवारांनी मुलासाठी बारामतीचे ग्रामदैवत काशिविश्वेश्वर मंदिरात प्रचाराचा नारळ फोडला. प्रत्येक विधानसभेला भावासाठी शड्डू ठोकणाऱ्या श्रीनिवास यांनी आता लेकासाठी शड्डू ठोकला आहे. युगेंद्र पवार यांच्या प्रचाराची सूत्रे त्यांचे वडील श्रीनिवास पवार, आई शर्मिला पवार यांनी हाती घेतली आहेत. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर लोकसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा पवार कुटुंबिय एकमेकांविरुद्ध उभे ठाकले आहेत.

# रस्ता नूतनीकरणाचे काम धीम्या गतीने

## रविप्रभा मित्र संस्थेची तक्रार

**। म्हसळा । वार्ताहर ।**

**शहरातील एसटी स्थानक ते नवानगर येथील एक किमी अंतराच्या रस्त्याचे नव्याने काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. हा रस्ता हा शहर बाजारपेठेत येण्यासाठीचा मुख्य रस्ता असल्याने या रस्त्यावरून मागील महिन्यापासून एसटी वाहतूक पूर्णतः बंद आहे. रस्ता नूतनीकरणाचे काम सुरू होऊन एक महिना संपला तरी अद्याप एक मार्गिका पूर्ण झालेली नाही. रस्त्याचे काम विकसकामार्फत धीम्या गतीने सुरू असल्याची तक्रार रविप्रभा मित्र संस्थेकडून करण्यात आली आहे.**



रस्त्याच्या दिरंगाईमुळे शहरातील नागरिकांसह तालुका शहरात येणाऱ्या-जाणाऱ्यांची फारच हेळसांड होत आहे. अशातच एसटी स्थानक हे शहर सोडून खारगाव खुर्द सकलप हद्दीत स्थलांतर केले असल्याने एसटी प्रवासीवर्गाची गैरसोय होत आहे. बाजारातून एसटी स्थानकावर जाण्यासाठी रिक्षाशिवाय पर्याय नसल्याने रिक्षाने प्रवास केल्यास ५० रुपये भाडे मोजावे लागते. रस्त्याचे बांधकाम गतीने झाल्यास नागरिकांची होणारी गैरसोय टळेल याच मागणीसाठी सामाजिक सेवा आणि अन्यायाला वाचा फोडणारी रविप्रभा मित्र संस्था पुढे आली आहे. संस्था अध्यक्ष रवींद्र लाड यांनी म्हसळा तालुका तहसीलदार, बांधकाम विभाग अभियंता आणि पोलीस निरीक्षक यांच्याकडे लेखी निवेदन देऊन रस्ता बांधकामाचे संथ गतीने होत असलेले काम गतीने करावे, अशी मागणी केली आहे. रस्ता बांधकामाबाबत यापुढे अशीच दिरंगाई होत असेल तर रविप्रभा मित्र संस्था जनतेसाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करेल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी निवेदन देताना अध्यक्ष रवींद्र लाड यांच्यासमवेत संचालक मंडळाचे सचिव संतोष उद्दरकर, संचालक नरेश विचारे, सुजित काते, सुशांत लाड, समीर लांजेकर उपस्थित होते.

# २९ ऑक्टोबरला दीपसंध्या कार्यक्रम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**




माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ व लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. लोकनेते अशोकदादा साबळे यांच्या ८ व्या स्मृतीदिनानिमित्त दीपसंध्या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार, दि.२९ ऑक्टोबर सायंकाळी ७ वाजता अशोकदादा साबळे विद्यालय माणगाव याठिकाणी करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा मनमुराद आंनद लुटावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

स्व. लोकनेते अशोकदादा साबळे यांच्या स्मृतीदिनानिमित्त या दिवशी सकाळी १० वाजता आदरांजली, सकाळी १०.३० वाजता सभा व सायंकाळी ७ वाजता पुरस्कार वितरण व दीपसंध्या अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी होणाऱ्या या कार्यक्रमात ऑल दि बेस्ट (ऑर्केस्ट्रा) संदीप कर्नावट दिग्दर्शक व्हर्सटाईल सेलिब्रिटी सिंगर पूजा सोंडकर (निर्माती), मराठी अभिनेत्री स्वाती धोकटे, फिफा अवॉर्ड २०२२ (कतार) गायक के.के. (कमरुद्दीन), मी होणार सुपरस्टार फेम- गायिका वर्षा एखंडे, आता होऊ दे धिंगाणा फेम- गायक विनल देशमुख, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त- मिमिक्री कलाकार सीमा पोटे, सुधाकर पोटे हे प्रसिद्ध कलाकार रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत. तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## बाजारपेठ फुलली

**अलिबाग । प्रतिनिधी ।**

दिवाळीचा सण दोन दिवसांवर येऊन ठेपला असल्याने अलिबागची बाजारपेठे सजल्याचे चित्र दिसून येत आहे. आकर्षक कंदील, विविध प्रकारच्या रोषणाईने बाजारपेठे उजळून निघाली आहे. फराळाचे साहित्य, रेडिमेड फराळ, विविध प्रकारच्या भेटवस्तूंनी दुकाने बहरली असून, खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी झाल्याचे पाहावयास मिळत आहे. रेडिमेड कपडे, भांड्यांची दुकानेही गजबजली आहेत.

# महिलेस चाकूचा धाक दाखवून चोरी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

वळके येथे रात्रीच्या सुमारास घरात शिरून महिलेस चाकूचा धाक दाखवून रोख रकमेची जबरी चोरीप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यामध्ये वळके येथील एका आरोपीस अटक केली आहे.




मुरूड तालुक्यातील वळके येथील ४५ वर्षीय पुष्पा सुभाष पाटील यांच्या राहत्या घरात दि. २३ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकरा वाजण्याचे सुमारास वळके येथील ३४ वर्षीय प्रमोद सखाराम काटकर यांनी घराच्या वरच्या मजल्यावर चढून घरातील जिन्यावाटे घरात प्रवेश केला व घरात एकटीच झोपलेल्या पुष्पा पाटील यांना त्याच्या हातातील चाकुचा धाक दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी त्यांनी कपाटात ठेवलेले ७३०० रूपये रोख रक्कम घेऊन जबरी चोरी केली, अशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आली आहे.

याबाबत रेवदंडा पोलिस ठाणे येथे पुष्पा पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलिस ठाणे सहा. फौजदार मिलिंद सुर्वे करत आहेत.

# विद्यार्थ्यांकडून मतदान जनजागृती रॅली

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. संविधान हे देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता तसेच संविधानाची मूल्ये शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरिक यांच्यामार्फत पोहोचावीत यासाठी शाळा, महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ साजरा करण्यात येत आहे.

भारतीय लोकशाही मजबूत करण्यासाठी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून रॅली काढून मतदान जनजागृती करण्यात येत आहे.

यावेळी नांदगाव, पडसरे शाळेतील विद्यार्थ्यांनी रॅली काढून आपले मत आपले भविष्य, मतदान राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, जना मनाचा पुकार मतदान आपला अधिकार अशा अनेक घोषणा देऊन मतदान जनजागृती करण्यात आली.

# सुधाकर घारे ३३ कोटींचे मालक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदारसंघात निवडणुकीला सामोरे जाणारे अपक्ष सुधाकर परशुराम घारे हे अब्जाधीश आहेत. त्यांनी निवडणुकीचा अर्ज दाखल करताना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात आपल्याकडील मालमत्तेचे विवरण दिले आहे. त्यात अनेक गाड्या सुधाकर घारे यांच्याकडे असून, वेगवेगळ्या भागात जमिनी तसेच घारे आहेत. घारे दाम्पत्याकडे तर स्थावर आणि जंगम अशी तब्बल ३३ कोटींची मालमता असल्याचे नमूद केले आहे. त्याचवेळी घारे यांच्यावर तीन गुन्हे दाखल असून, ते पदवीधर आहेत. त्यांनी २०२१ मध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात पदवी मिळविली आहे. दरम्यान, सुधाकर घारे यांच्यावर दोन कोटींचे कर्ज असून, त्यांनी एक कोटी दहा लाखाचे कर मागील वर्षी भरले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते असलेले सुधाकर घारे यांनी कर्जत विधानसभा मतदारसंघ महायुतीमध्ये शिवसेना पक्षाकडे गेल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन अपक्ष उमेदवार म्हणून नामांकन अर्ज दाखल केला आहे. नामांकन अर्ज दाखल करताना सुधाकर घारे यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले असून, त्यात आपल्या कडील संपत्ती तसेच वाहने,सोने,कर्ज यांची माहिती दिली आहे. पात्रात सुधाकर घारे तसेच त्यांच्या पत्नी नमिता घारे यांच्या संपत्तीची माहिती देण्यात आली आहे.

सुधाकर घारे यांच्यावर तीन गुन्हे दाखल आहेत. एक गुन्हा मुंबई जुहू पोलीस ठाणे येथील असून, अन्य दोन गुन्हे हे कर्जत पोलीस ठाण्यात दाखल झालेले आहेत. त्या सर्व गुन्ह्यांचे स्वरूप हे मारझोड करणे, धमकावणे आणि फसवणूक करणे या स्वरूपातील आहेत. सुधाकर घारे यांच्याकडे स्थावर मालमता २४ कोटींची असून, ती खरेदी केलेली असल्याचे नोंदविण्यात आले आहे. त्यांच्या पत्नी नमिता यांची स्थावर मालमता दीड कोटींची असून, जंगम मालमतामध्ये घारे यांची संपत्ती तीन कोटी ७० लाख एवढी असून, नमिता घारे यांच्याकडील जंगम मालमत्ता ३५ लाखांची आहे. दोघांनी बांधकाम क्षेत्रात केलेली गुंतवणूक ही ४४ लाखांची आहे. अशी एकूण ३३ कोटींचे मालक सुधाकर परशुराम घारे हे अपक्ष उमेदवार आहेत.

# अध्यक्षपदी अमित गायकवाड



**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

वंचित बहुजन आघाडीचे माजी युवा अध्यक्ष अमित गायकवाड आणि रायगड जिल्हा उत्तर महासच वैभव केदारी यांनी काही दिवसांपूर्वी वंचित बहुजन आघाडीचा राजीनामा दिला होता. त्याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेत त्यांनी प्रवेश केला. ांबेडकरी चळवतील योगदान पाहता आनंदराव आंबेडकर यांनी अमित गायकवाड व वैभव केदारी यांच्यावर रायगड जिल्ह्याची जबाबदारी सोपवली. मुंबई येथील बौद्धजन पंचायत समिती कार्यालयात आनंदराज आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये त्यांचा प्रवेश झाला होता. यावेळी आनंदराज आंबेडकर, संतोष पवार, अमित गायकवाड, वैभव केदारी, सचिन गायकवाड, संजय गायकवाड, अश्विनी ठाकूर, पुष्पांजली सकपाळ आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## धनुष्यबाणाला ताप, कमळाला मनस्ताप

अधिकृत उमेदवारांचा ताप वाढला असून, पेण, उरणमधील भाजपच्या अधिकृत उमेदवारांना भोईरांच्या भूमिकेचा मनस्ताप होणार असल्याचे बोलले जात आहे. काही महिन्यांपूर्वी भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनी एकहाती सत्ता स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागा, असेही सांगण्यात आले होते. जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. त्यामुळे अंतर्गत बंडखोरी करुन मित्रपक्षांना संपविण्यासाठी व्यूहरचना आखली जात आहे. याच पार्श्वभूमीवर दिलीप भोईर उमेदवारी अर्ज भरणार असल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरु आहे.

## खरसांबळेंना मारहाण करणारे मोकाटच

आला होता. त्यांच्यावर हॉकी स्टीकने वार करून त्यांना गंभीर जखमी केले होते. शिंदे गटातील राजा केणी यांच्या सांगण्यावरून हा हल्ला केल्याचा आरोप खरसांबळे यांनी केला होता. ही घटना घडून १२ तास उलटून गेले होते. तरीदेखील पोलिसांनी मारेकऱ्यांविरोधात कोणतीही कारवाई केली नाही. यातील मुख्य सूत्रधार राजा केणी आहे, असे सांगूनही पोलिसांनी त्याची पंचनाम्यात नोंद घेण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप खरसांबळे यांनी केला आहे. खरसांबळे यांच्यावर अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यानंतर त्यांना अधिक उपचारासाठी मुंबईतील दवाखान्यात पाठविण्यात आले होते. आता ते उपचार करून घरी आले आहेत. मात्र, ही घटना घडून पंधराहून अधिक दिवस उलटून गेले आहेत. परंतु, अद्यापपर्यंत पोलिसांकडून न्याय मिळाला नसल्याची खंत खरसांबळे यांनी व्यक्त केली आहे.

रात्रीच्यावेळी झालेल्या हल्ल्याची दखल पोलिसांनी घेतली नसल्याने पोयनाड पोलिसांच्या या भूमिकेबाबत खरसांबळे यांच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त केला.

**मंगळवारी (दि.८) रात्री झालेल्या हल्लेखोराविरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चौघांविरोधात गुन्हा नोंदविला आहे. खरसांबळे यांच्या पंचनामा व जबाबात राजा केणी यांचा उल्लेख नसल्याने त्यांचे नाव टाकण्यात आले नाही. त्यांनी जिल्हा रुग्णालयात जो जबाब दिला. त्यावरून गुन्हा नोंदविण्यात आला असून, त्यांना दोन दिवसांपूर्वी अटकपूर्व जामीन मिळाला आहे.**

**- संतोष दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोयनाड**

## रायगडमध्ये युवापर्व

दिली आहे. गेल्या काही वर्षांपासून महिला आघाडीचे काम त्या पाहात आहेत. त्या मतदारसंघात त्यांनी या अगोदरपासूनच तयारी केली आहे. पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील यांनी अखेर चित्रालेखा पाटील यांच्या नावाची घोषणा केली. त्यांच्या रूपाने तरुण उमेदवार अलिबाग विधानसभा मतदारसंघाला मिळाला आहे. या अगोदर दिवंगत माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांनी अलिबाग विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवली होती. त्यांच्यानंतर चित्रलेखा पाटील यांच्या रूपाने पक्षाने महिला उमेदवार या ठिकाणी दिला आहे. त्यांची लढत विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्याशी निश्चित झालेली आहे. त्याचबरोबर महाड विधानसभा मतदारसंघात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून माजी आमदार माणिकराव जगताप यांच्या कन्या स्नेहल यांना उमेदवारी दिली आहे. त्या या अगोदर काँग्रेस पक्षात होत्या महाडचे नगराध्यक्षपद त्यांनी सांभाळले आहे. मशाल चिन्हावर रिंगणात उतरलेल्या स्नेहल जगताप या प्रतिस्पर्धी उमेदवार भरत गोगावले यांच्यापेक्षा तरुण आहेत. त्यामुळे मतदार नेमके कोणाच्या पारड्यात मत टाकतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पेण विधानसभा मतदारसंघामध्ये माजी मंत्री रवीशेठ पाटील यांना भारतीय जनता पक्षाने पुन्हा एकदा संधी दिली आहे. त्यांच्या विरोधामध्ये शेतकरी कामगार पक्षाने दंड थोपटले आहे. शेकापने अतुल म्हात्रे हा नवीन चेहरा पुढे आणला आहे. रवीशेठ पाटील हे सत्तरीच्या घरामध्ये आहेत. त्यामुळे ज्येष्ठ विरुद्ध तरुण अशा प्रकारची लढत या ठिकाणी होणार आहे. मतदार नेमके कोणाला निवडतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. कर्जत या ठिकाणी पन्नाशी पार केलेल्या आमदार महेंद्र थोरवे यांच्याविरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने नितीन सावंत यांच्या रूपाने तरुण चेहरा मैदानात उतरवला आहे. त्या ठिकाणीसुद्धा काटे की टक्कर अपेक्षित आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये या मतदारसंघात खासदार श्रीरंग बारणे पिछाडीवर होते. त्यामुळे या निवडणुकीत उबाठा आणि पर्यायाने सावंत यांच्या अशा पल्लवीत झालेल्या आहेत.

**पनवेलमध्ये बाळाराम पाटलांचे पारडे जड**

शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाळाराम पाटील यांना शेतकरी कामगार पक्षाने उमेदवारी दिली असून, त्यांना जनतेचा वाढता पाठिंबा दिसून येत आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, शिक्षक मतदारसंघाचे आमदार म्हणूनही त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांनी केलेल्या विकासकामांमुळे त्यांचे पारडे जड महायुतीचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांच्यापेक्षा त्यांना मतदारांचा पाठिंबा मिळत आहे.

## खारेपाटात शेकापच्या प्रचाराचा झंझावात

पक्षातील प्रमुख नेत्यांनी केलेले लढे व संघर्षामुळे सर्वसामान्यांना कसा न्याय मिळाला, याची माहितीदेखील देण्यात येत आहे. दरम्यान, तोच वारसा पुढे नेण्यासाठी आमदार म्हणून निवडून देण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या प्रचाराला चांगला प्रतिसाद मिळत आहे. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी रविवारी (दि.२७) त्यांच्या प्रचाराला सुरुवात केली. सांबरी येथील दत्त मंदिरात जाऊन तेथील देवाचे दर्शन घेऊन प्रचाराचा नारळ वाढविला. त्यानंतर सांबरी गावात जाऊन येथील अनेक कार्यकर्ते व मतदारांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगरसेवक तथा जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, अलिबाग पंचायत समितीच्या माजी सभापती विद्या म्हात्रे, बाळूशेट पाटील, विलास म्हात्रे, अनिल पाटील, प्रकाश पाटील, कलेंद्र पाटील, भगवान पाटील, अशोक पाटील, संजीव पाटील, सुरेंद्र पाटील, आवेटी रामदासवाडीमधील सुनील म्हात्रे, संतोष म्हात्रे, सतीश म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, तरुण, तरुणी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. चिऊताई तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो, लाल बावटे की जय अशा अनेक घोषणा देत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर आवेटी, रामदासवाडी, कुर्डूस, बिडवागळे या ठिकाणीदेखील त्यांनी प्रचार दौरा केला. दुपारी उन्हाचे चटके लागत असतानादेखील कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने, स्वयंस्फूर्तीने या प्रचारात सहभागी झाले होते. एक वेगळा आनंद व उत्साह कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. दुचाकीसह चारचाकी गाड्यांचा ताफा शेकडो कार्यकर्ते चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्यासोबत प्रचारात सहभागी झाले हाते.

## गोरगरीबांना केंद्रबिंदू ठेवून काम करणार

निवासस्थानी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना अलिबाग, मुरूड व रोहा विधानसभा मतदार संघातील शेकापच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई रविवारी (दि.२७) बोलत होत्या. शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा कष्टकरी, शेतकरी, कामगार व सर्वसामान्य जनतेची आणबाण शान आहे. ७५ वर्षांची परंपरा असलेल्या पक्षाने अनेक लढे दिले आहेत. संघर्ष केले आहेत. तसेच त्यागही केला आहे.शेकापचे नेते जयंत पाटील तरुण, महिलांना पुढे नेण्याचे काम करीत आहेत. त्यांना सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी पुढाकार घेत आहे. हे वेगवेगळ्या उपक्रमातून दिसून येत आहे. राजकीय, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रात तरुणांना संधी देण्याचे काम ते करीत आहेत. मला उमेदवारी देऊन हे त्यांनी दाखवून दिले आहे.शेतकरी कामगार पक्षाने सर्व घटकाचा विचार केला आहे. शिक्षण, रोजगाराचे साधन खुले करून तरुणांना एक वेगळी संधी देण्याचे काम केले आहे. नारायण नागू पाटील, स्व. स्व. प्रभाकर पाटील, स्व. ॲड. दत्ता पाटील, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील तसेच आपले सर्वाचे नेते जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील यांनी प्रचंड मेहनत घेऊन पक्षाचा पाया खंबीरपणे असा उभा केला आहे.

ॲड. दत्ता पाटील, प्रभाकर पाटील, यांनी विधानसभा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम केले आहे. तिच परंपरा जपत शेकापचे नेते जयंत पाटील, पंडित पाटील, ॲड. आस्वाद पाटील यांनीदेखील काम केले आहे. जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांनी केलेल्या कामामुळे आज आपली एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. लढवय्या पक्ष म्हणून आपल्याकडे पाहिले जाते. जो पक्ष संघर्षातून उभा केला आहे. त्या पक्षाचा सन्मान राखण्याची जबाबदारी नक्की प्रामाणिकपणे करेन. पक्षाने मोठ्या विश्वासने माझ्यावर जी जबाबदारी दिली आहे. ती चांगल्या पद्धतीने पार पाडून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा नक्की प्रयत्न करेन अशी ग्वाही चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी दिली.मागील निवडणुकीत आपण गाफील राहिलो. त्यामुळे आपला पराजय झाला आहे. अनेकजण आमदाराच्या भूलथापांना बळी पडून त्यांच्या पक्षात प्रवेश करीत आहेत. परंतु, या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी गाफिल न राहता काम करायचे आहे.

## भरघोस मतांनी निवडून द्या : ॲड. गौतम पाटील

अधिवेशनात बोलणारे उमेदवार पक्षाने दिला आहे. चित्रलेखा पाटील या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांना भरघोस मतांनी निवडून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगरसेवक ॲड. गौतम पाटील यांनी केले.

## काँग्रेस जिल्हाध्यक्षांचा तडकाफडकी राजीनामा

ओझे उचलणार नाही, असे कार्यकर्त्यांचे म्हणणे होते. जोपर्यंत महाराष्ट्र प्रदेशचे नेते आदेश देत नाही, तोपर्यंत आपण कोणत्याही पक्षाचे काम करायचे नाही, असे ते म्हणाले. तसेच बॅरिस्टर ए.आर. अंतुले साहेबांच्या रायगड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला एकही विधानसभा मतदारसंघ न देता भोपळा मिळाला, त्यामुळे महेंद्र घरत यांनी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रदेश चिटणीस तथा रायगड सहप्रभारी श्रीरंग बरगे यांच्यासमोर रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षपदाचा राजीनामा सादर केला. जनतेच्या संवाद सभेसाठी रायगड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उरण मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या मदतीशिवाय कोणताही उमेदवार निवडून येऊ शकत नाही, ही काळ्या दगडावरची रेष असल्याचे काँग्रेस कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे उरण विधानसभेत काँग्रेस पक्ष किंगमेकर असेल, असेही घरत म्हणाले.

## मी पहाटे उठून कुठे जात नाही

अप्रत्यक्ष मदत केल्याचं खुद्द त्यांनीच सांगितलं होतं. हर्षवर्धन पाटील म्हणाले होते की, सुप्रिया सुळे या आमच्या भगिनी आहेत. आम्हाला अभिमान आहे की, त्या चारवेळा खासदार झाल्या आहेत. पण त्यामध्ये तीनवेळा आमचा प्रत्यक्षपणे सहभाग होता. मात्र, यावेळी या लोकसभेच्या निवडणुकीत आमचा अदृश्य सहभाग होता, असं हर्षवर्धन पाटील यांनी म्हटलं होतं.

दरम्यान, हर्षवर्धन पाटील यांच्या या विधानावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इंदापूरमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या सभेत टीका केली होती. अजित पवार यांनी म्हटलं होतं की, तुमच्यावर कसा विश्वास ठेवायचा? एकीकडे तुम्ही आम्हाला घरी नेत जेवायला घालता आणि आता म्हणता अदृष्य प्रचार केला?, असं म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सवाल उपस्थित केले होते. यानंतर हर्षवर्धन पाटील यांनी अजित पवारांना प्रत्युत्तर देत खोचक टीका केली आहे. हर्षवर्धन पाटील म्हणाले की, अजित पवार हे मोठे नेते आहेत. त्यामुळे त्यांना कोणत्याही सभेत काहीही बोलायला परवानगी असते. कारण ते कोणत्याही सभेत कोणाच्याही विरोधात बोलतात. ते का बोलतात तर महाराष्ट्राचे सर्वात मोठे नेते आहेत. त्यामुळे सहाजिकच आहे की, ते इंदापूरमध्ये आल्यानंतर माझ्यावर बोलल्याशिवाय त्यांचं भाषण होत नाही.

मात्र, मी पहाटे उठून कुठे जात नाही. माझा कारभार जनतेमध्ये असतो. त्यामुळे जनतेच्या आग्रहाखातर आम्ही शरद पवारांबरोबर जाण्याचा निर्णय घेतला, असं हर्षवर्धन पाटील यांनी म्हटलं आहे.

# गरजवंतांना दिवाळी फराळाची भेट



**। माथेरान । वार्ताहर ।**

दिवाळी सण हातावर पोट भरणाऱ्या कष्टकरी तसेच विधवा महिलांना तसेच अपंगांना साजरा करता यावा यासाठी येथील हॉटेल वे साईडचे मालक अब्बास अल्ली हुसेन पिरभोय यांच्या माध्यमातून त्यांचे चिरंजीव हैदर अब्बास अल्ली पिरभोय यांच्या हस्ते दि.२६ रोजी हॉटेल वे साईड इनमध्ये गरजवंतांना दिवाळीच्या फराळाचे साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये साखर, रवा, तेल, डालडा, बेसन पीठ या साहित्याचा समावेश आहे. अनेक गरजवंत विधवा महिलांनी याचा लाभ घेतला. अब्बास अली हुसेन पिरभोय गरजवंतांना साहित्याचे वाटप करत असतात. यावेळी अब्बास अल्ली हुसेन पिरभोय यांच्यासह हॉटेल व्यवस्थापक मेहमूद खान उपस्थित होते.

माथेरानसाठी काहीना काही सढळ हस्ते मदत करण्यासाठी अब्बास अल्ली यांचा सिंहाचा वाटा असतो. येथील दवाखान्यात पॅथॉलॉजी लॅब सुरू करण्याची त्यांची इच्छा असून, हे पर्यटनस्थळ पब्लिक प्लेस असल्यामुळे इंग्रजी भाषेवर युवावर्गाचे प्रभुत्व असावे यासाठी लवकरच आपल्या हॉटेलमध्ये मोफत इंग्रजी स्पिकिंग कोर्स सुरू करणार आहेत.

# चिनी मातीचे मावळे बाजार दाखल



**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

दिवाळीची सुट्टी पडली की शालेय विद्यार्थी किल्ले बनविण्याचा उपक्रम हाती घेतात. बाजारपेठेत विविध प्रकारचे किल्ल्यांसाठी लागणारे साहित्य दाखल झाल्यामुळे मुले हे मावळे खरेदी करण्यासाठी गदी करत आहेत.

ग्रामीण भागत लहान मुले मोठ्या हौसेने किल्ला बनवीत असतात. परंतु या किल्ल्यांसाठी आवश्यकता असते ती मावळ्यांची. म्हणूनच मावळे खरेदीसाठी शालेय विद्यार्थ्यांची लगबग सुरु झाली आहे. वीस रुपयांपासून ते पन्नास, शंभर रुपयांपर्यंत हे मातीचे मावळे विक्रीस ठेवले असल्यामुळे यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्याचे पहावयास मिळत आहे. यामध्ये हत्ती, घोडे, तोफ, गवळण, शेतकरी, विविध प्रकारचे पक्षी, वाघ, सिंह हे सर्व विक्रीस ठेवल्याने प्रत्येक विद्यार्थी आवर्जून खरेदी करीत असल्यामुळे याची मागणी वाढली आहे.



# खारेपाटात चिऊताईंचे जोरदार स्वागत



● (छायाचित्र : समीर मालोदे)

# औद्योगिक क्षेत्रातील वातावरण भयमुक्त करणार

## स्नेहल जगताप यांचे प्रतिपादन



**। महाड । वार्ताहर ।**

महाड औद्योगिक क्षेत्रात गेली अनेक वर्षे राजरोसपणे सुरु असलेल्या गुंडगिरी, दहशतीला कारखानदार व अधिकारी वैतागले असून येत्या काळात या दहशतीचा पूर्णपणे नायनाट करून औद्योगिक क्षेत्रातील वातावरण भयमुक्त करणार असल्याचे प्रतिपादन शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या नेत्या आणि महाड विधानसभा मतदार संघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप यांनी केले.

शैलेश देशमुख यांनी देशमुख कांबळे गावातून १०० टक्के म त्याधिक्य स्नेहल जगताप यांना देणार असल्याची ग्वाही दिली. आगामी काळात देशमुख कांबळे ग्रामपंचायत मधील सरपंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा असेल असा विश्वास व्यक्त करत विचार एकत्र आल्याने परिवर्तन होणार आहे व त्या मध्ये देशमुख कांबळे गावाचा खारीचा वाटा असेल असे मत व्यक्त केले

देशमुख कांबळे येथील माजी आमदार चंद्रकांत देशमुख यांचे चिरंजीव शिंदे गटाचे नेते उद्योजक शैलेश देशमुख यांच्यासह माजी सरपंच सरोज देशमुख, युवा सेना उप तालुका प्रमुख राकेश देशमुख, शंतनु देशमुख, राज देशमुख, रूपाली देशमुख यांच्यासह असंख्य शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला

त्यावेळी स्नेहल जगताप यांनी महाड औद्योगिक क्षेत्रातील राजकीय दहशतीवर जोरदार भाष्य केले. २०वर्षे कान्ट्रॅक्टमध्ये काम करूनही स्थानिक कामगारांना न्याय मिळत नाही, अशा अन्यायग्रस्त कामगारांना न्याय दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचेही स्नेहल जगताप यांनी स्पष्ट केले.

यावेळी नानासाहेब जगताप, तालुकाप्रमुख आशिष फळस्कर, तालुका संघटक राजू कोर्पे, माजी जिप सदस्य अमित मोरे, संपर्क प्रमुख रघुविर देशमुख, माजी नगराध्यक्ष संदीप जाधव, सुदेश कलमकर रामतात्या देशमुख, शशिकांत देशमुख आदी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शैलेश देशमुखसह राकेश देशमुख यांनी आपले विचार व्यक्त करत स्नेहल जगताप यांना निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला.

# मुमूर्शी बौद्धवाडीचा शिंदे सेनेतून उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश

**। महाड । वार्ताहर ।**

महाड विधानसभा मतदार संघातील अनेक ग्रामस्थ महिला, तरुण मतदार उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश करत असून विजयाची नांदी वाजू लागली आहे. सत्तेची मस्ती जनता उतरवणार त्याची सुरूवात म्हणजे मुमूर्शी बौद्धवाडीचा प्रवेश असल्याची प्रतिक्रिया स्नेहल जगताप यांनी या पक्ष प्रवेशाप्रसंगी दिली.

हा प्रवेश म्हणजे या विभागात परिवर्तनाची नांदी असल्याचे मत श्रीधर सकपाळ यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ शिवसैनिक परशुराम अण्णा बेल, महाड विधानसभा संपर्क प्रमुख अमित मोरे, जिल्हा सह समन्व्यक सोमनाथ ओझर्डे, तालुका युवासेना

- **सत्तेचा मस्ती जनता उतरवणार त्याची सुरूवात म्हणजे आजचा मुमूर्शी बौद्धवाडीचा प्रवेश- स्नेहल जगताप**
- **मुमूर्शी बौद्धवाडी प्रवेश म्हणजे विभागात परिवर्तनची नांदी- श्रीधर सकपाळ.**

अधिकारी प्रफुल धोंडगे, तुकारामबुवा खेडेकर, विभाग प्रमुख सचिन पवार, उपतालुका युवा सेना अधिकारी महेंद्र जोगळे, नजीर कावळेकर, मधुकर आंग्रे, अरुण आंग्रे, युसूफ पोशीळकर, एकनाथ पार्टे, इम्रान कोंडेकर, सलीम कोंडेकर, सुभाष पवार, सूर्यकांत उतेकर, बबन भालेकर, नितेश जंगम, साहिल पवार यांच्या उपस्थिती मध्ये मुमूर्शी बौद्धवाडीमधील मुंबई मंडळ अध्यक्ष भागुराम सकपाळ, सेक्रेटरी सिद्धार्थ सकपाळ, संदीप सकपाळ, कैलास सकपाळ, अरुण सकपाळ, जनार्दन धोत्रे, दुर्वेन धोत्रे, महेंद्र सकपाळ, दिलीप सकपाळ, गणेश सकपाळ, अविनाश सकपाळ, नवीन सकपाळ, वैभव सकपाळ, विनोद सकपाळ, रणजित सकपाळ, सुदाम सकपाळ आदींनी पक्ष प्रवेश करत स्नेहल जगताप याच्या पाठीशी आपण ठाम उभे राहणार असल्याचे ग्वाही देत येणाऱ्या निवडणुकीत जास्तीत जास्त मताधिक्य देणार असल्याचे प्रस्तुत प्रतिनिधीजवळ बोलताना सांगितले.

# पारमाची ग्रामस्थांचा उद्धव ठाकरे पक्षात प्रवेश

**। महाड । प्रतिनिधी ।**

पारमाची गावावर नैसर्गिक आपत्ती आली तेव्हा तेव्हा स्व.माणिक जगताप यांनी वेळोवेळी या गावाला न्याय मिळवून देण्याचा व सहकार्य चा हातभार दिला होता, असे सांगत गाव विकासाच्या नावाखाली खितपत पडले होते. आता स्नेहल जगताप यांच्या नेतृत्वाखाली या गावाचा विकास साधता येणार असल्याची ग्वाही रघुवीर देशमुख यांनी पारमाची ग्रामस्थाचा पक्ष प्रवेशादरम्यान दिली आहे.

रविवार (दि.२७) हा पक्ष प्रवेशाचा सुपर संडे ठरला असल्याने पक्ष प्रवेश करणाऱ्या ग्रामस्थानी कॅप्टन जगताप बंगल्यावर एकच गर्दी केली होती. पारमाची गावातील अनेक ग्रामस्थ गेली १५ वर्षे गावाचा विकास होईल. या आशेने विरोधकासोबत होते, मात्र त्यांचा भ्रमनिरास झाल्याने अखेर ग्रामस्थांसह तरुण मंडळीने गावाच्या विकासासाठी व रोजगारसाठी भावी आमदार स्नेहल जगताप यांच्या व्हिजनवर विश्वास ठेवत पक्ष प्रवेश केला आहे.

पारमाची गावातील पक्ष प्रवेश कर्त्यांना सन्मानाची वागणूक देताना त्यांचा सन्मान राखला जाईल असा विश्वास देण्यात आला. यावेळी महाड विधानसभा मतदार संघाच्या आघाडीच्या उमेदवार स्नेहल माणिक जगताप समवेत महाड विधानसभा नेते हनुमंत जगताप, विधानसभा संपर्क प्रमुख अमित मोरे, तालुका प्रमुख आशिष फळसकर, तालुका संपर्क प्रमुख रघुवीर देशमुख, जिल्हा वाहतूक सेना प्रमुख सुभाष मोरे, राजू कोरपे, सरपंच चैतन्य म्हामुणकर, सरपंच जयवंतराव देशमुख, तालुका युवासेना अधिकारी प्रफुल धोंडगे, शहाजी देशमुख, अविनाश चौधरी, इम्रान कौचाली, धोंडीराम डोंबे, गणेश देशमुख यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते

यावेळी रघुवीर देशमुख यांनी ही परीवर्तनाची लाट असल्याचे सांगत असंख्य गाव शिवसेना पक्षात प्रवेश करत आहेत. असे सांगत पारमाची गावात २० टक्के विरोधक शिल्लक असल्याचे सांगत येत्या काही दिवसात सदरचे गाव शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेंचा बालेकिल्ला असल्याचे दाखवून देईल, असा आशावाद व्यक्त केला.

यावेळी पारमाचीचे सतिश पवार, रविकांत कंक, संतोष पवार, नीलकंठ पवार, मानाजी कदम, आर्यन पवार, प्रकाश झोरे, सुरेश पवार, ज्ञानदेव पवार, कांचन पवार, अरुणा पवार, चंद्रकला पवार,योगेश जाधव, प्रसाद चारी, संजय लाड आदी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी ठाकरे पक्षात प्रवेश केला.

## जगताप यांनी सर्व घटकांना प्रतिनिधित्व दिले - अल्ताफ काझी

# मुस्लिम बहुल प्रभागामधून स्नेहल जगताप यांना मताधिक्य देणार

**। महाड । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या स्नेहल माणिकजगतापयांच्याप्रचारार्थमहाड शहरात शिवसेना कार्यकर्त्यांच्या प्रभागनिहाय बैठकांचा धडाका सुरू असून मुस्लिम बहुल प्रभागामधून जोरदार प्रतिसाद मिळत आहे.



महाड शहरातील साळीवडा नाका, खारकांड मोहल्ला, देशमुख मोहल्लामधून स्नेहल जगताप यांना मताधिक्य देणार असल्याचे ग्वाही अल्ताफ काझी यांनी दिली तर स्थानिक स्वराज्य निवडणूक सर्व समाज घटकांना न्याय देण्याचे काम स्व. माणिक जगताप यांनी केले असल्याचे सांगत शिवसेनेच्या उमेदवार स्नेहल जगताप यासुद्धा त्याचीच अंमलबजवणी करत असल्याचा विश्वास व्यक्त केला.

महाड मोहल्ला येथे झालेल्या या बैठकांमध्ये प्रा. सुर्यकांत शिलीमकर, सुदेश कलमकर, संदीप जाधव, धनंजय देशमुख, उपशहरप्रमुख मंगेश देवरूखकर, विजय तांबट, सुभाष शिरशिवकर, प्रमोद महाडीक, वजीर कोंडीवकर, अस्लम पानसरे, अल्ताफ काझी, तृप्ती रत्नपारखी, अस्मिता शिंदे, गितांजली मोरे, अक्षय दळवी, पुजा गोविलकर, स्मिताली यादव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी विविध मान्यवरांनी आपले मत व्यक्त करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. येणारी निवडणूक ही परिवर्तनाची असल्याचे सांगत महिलांना न्याय देण्याची वेळ आली असून महाडचा राजकीय इतिहास सुवर्ण अक्षरांनी नोंदविला जाणार आहे. यामध्ये मुस्लिम समाजाचा खारीचा वाटा असेल स्व. माणिक जगताप यांनी मुस्लिम समाजाला निवडणूक काळात दिलेले महत्व कधीच विसरता येणार नसल्याचे सांगत त्याची परतफेड स्नेहल जगताप यांना विजयी करत करायची असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# प्रचार हवा, शिमगा नको

सर्व पक्षांच्या जागावाटपाचा घोळ अजूनही चालूच आहे. अर्ज दाखल झाल्यानंतरही तो सुरू राहील. चार नोव्हेंबरला अर्ज माघारीची शेवटची तारीख आहे. त्याच दिवशी खरे चित्र स्पष्ट होईल. पण उमेदवार कोणीही असला आणि जागा कोणालाही सुटली तरी असंतुष्ट इच्छुकांचे प्रमाण भरपूर आहे. त्यामुळे बंडखोरीही सर्वत्र होणार आहे. काही ठिकाणी उघड तर काही ठिकाणी छुपी. त्यामुळे यंदा बहुतेक मतदार संघांमध्ये अनिश्चितता राहणार आहे. त्यातच परिवर्तन महाशक्ती, नवनिर्माण सेना, वंचित वगैरे घटक आहेत. यांचा परिणाम असा की हमरीतुमरी वाढणार आहे. कार्यकर्ते हातघाईवर येणार आहेत. याची चुणूक परवा संगमनेरमध्ये पाहायला मिळाली. बाळासाहेब थोरात यांच्या कन्येबद्दल कोणा वसंत देशमुख यांनी जे गलिच्छ उद्गार काढले ते पाहता यंदा प्रचार आणखी किती खालची पातळी गाठणार याची चिंता निर्माण होते. संगमनेर हा काँग्रेसचे बाळासाहेब थोरात यांचा पारंपरिक मतदारसंघ. थोरात हे शांत व संयमी आणि अजिबात वादग्रस्त नसलेले नेते म्हणून ओळखले जातात. मध्यंतरी त्यांचे भाचे सत्यजित तांबे यांनी भाजपच्या मदतीने विधानपरिषद लढवली तेव्हा काहीसा वाद निर्माण झाला होता. मात्र काँग्रेसशी आपण एकनिष्ठ आहोत हे पटवून देण्यात ते यशस्वी झालेले दिसतात. म्हणूनच अलिकडे ठाकरे सेनेसोबत फारच वाद होऊ लागले तेव्हा नाना पटोले यांना डावलून चर्चेची जबाबदारी थोरातांवर टाकण्यात आली. या थोरातांचे नगरमधील विखे घराण्याशी पूर्वापारचे वैर आहे. राधाकृष्णविखे यांचे चिरंजीव सुजय विखे हे लोकसभेला पराभूत झाले. त्यामुळे ते विधानसभेच्या तिकिटाची मागणी करीत होते. निलेश लंके यांना थोरातांनी पाठबळ दिल्याने आपला पराभव झाला असे विखे यांना वाटते. ते खोटे नाही. याच थोरात आणि कोल्हे या साखरसम्राटांनी एकत्र येऊन जिल्हा बँक विख्यांकडून काढून घेतली. त्यामुळे संगमनेरमधून थोरात यांच्याविरोधात आपण अपक्ष लढणार असे सुजय विखे यांनी जाहीर केले आहे.

## टाळ्या वाजवणारे प्रेक्षक

या मोहिमेचा भाग म्हणून गेले महिनाभर ते सतत संगमनेर व आसपास सभा भरवून आक्रमक भाषणे करीत आहेत. नेता कितीही मोठा असला तरी आजच्या काळात त्याला त्याच्याच गावात विरोधक असतातच. शरद पवारांनादेखील बारामतीत बरेच प्रबळ विरोधक आहेत व काही काळ माळेगावचा साखर कारखानाही विरोधकांच्या ताब्यात होता. थोरात यांनाही असेच विरोधक आहेत. त्यांना हाताशी धरून विखे यांनी आपला प्रचार चालू केला. मात्र त्यात वैयक्तिक नालस्ती अधिक होती. हे फारच वाढू लागल्याने बाळासाहेब थोरात यांची कन्या डॉ. जयश्री थोरात यांनी मध्यंतरी जाहीररीत्या सुजय यांना आव्हान दिले व आपल्या वडिलांबद्दल कोणीही अपशब्द बोलू नये असा इशारा दिला. विखे यांनी थोरात यांच्या न केलेल्या कामांबद्दल किंवा कथित भ्रष्टाचाराबद्दल बोलणे हे समजू शकते. पण त्यांनी वैयक्तिक टीका करणे गैर होते. ते ती आवरती घेतील अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात गेल्या आठवड्यात धांदरफळ येथे झालेल्या विखे यांच्या सभेत वसंत देशमुख नावाच्या एका नेत्याने जयश्री थोरात यांच्यावर अत्यंत वाईट टीका केली. जयश्री यांना मुले कशी झाली आणि जयश्री यांच्याविषयी लोक काय बोलतात असे अत्यंत वाह्यात व बदनामीकारक उद्‌गार या देशमुखांनी काढले. वास्तविक सुजय विखे यांनी त्यांना भर सभेतच रोखायला हवे होते. पण त्यावेळी ते हसताना व टाळ्या वाजवताना दिसले. सभेसाठी आलेल्या लोकांनाही त्यावेळी या उद्गारांतला गलिच्छपणा जाणवला नाही व अनेकांनी टाळ्या व शिट्ट्या वाजवून त्याला दाद दिली. हा सर्वच प्रकार अत्यंत निंदनीय आहे. एकीकडे शिवाजीमहाराज, सावित्रीबाई फुले इत्यादींची नावे घ्यायची आणि दुसरीकडे महिलांबाबत असले घाणेरडे उद्‌गार काढायचे हा भयंकर प्रकार आहे. त्याला लोकांनी हसून पाठिंबा द्यावा हे त्याहूनही गंभीर आहे.

## मुद्द्यांवर बोला

नंतर या उद्‌गारांवरून संगमनेर पेटून उठले व काही गाड्यांची मोडतोड व जाळपोळ झाली. पोलिसांनी देशमुखांवर त्वरीत कारवाई करणे अपेक्षित होते. पण चोवीस तास होऊनही त्यांना अटक झाली नव्हती. शिंदे सरकार हे एकीकडे लाडक्या बहिणींना मदत केल्याची जाहिरातबाजी करते आणि दुसरीकडे बदलापूर अत्याचाराच्या किंवा संगमनेर गलिच्छ टीकेसारख्या घटना घडतात तेव्हा फडणवीसांचे पोलिस थंडपणे कारवाई करतात. गेल्या काही वर्षांमध्ये निवडणूक प्रचाराची पातळी अधिकाधिक घसरत चालली आहे. निवडणुकीत सर्व काही क्षम्य असते असे राजकारण्यांनी स्वतःच ठरवून टाकले आहे. त्यामुळे ते वाटेल ती शिवीगाळ व वैयक्तिक टीका करतात. वास्तविक प्रचारामध्ये जनतेचे प्रश्न, त्याबाबत आपापल्या पक्षांचे धोरण व प्रश्नांवरची उत्तरे यांची मांडणी अपेक्षित असते. या मुद्द्यांवर विविध बाजूंनी मते व्यक्त व्हावीत व जनतेने त्यातून निवड करावी अशी अपेक्षा असते. पण फुटीरता, बंडखोऱ्या यामुळे राज्यातील राजकारणाचे फार भजे झाले आहे. विचारांवरची निष्ठा, प्रामाणिकपणा यांना काही महत्वच उरलेले नाही. कालपर्यंत भाजपच्या हिंदुत्वाचे कडवे पुरस्कर्ते आज काँग्रेसमध्ये येऊन लगेच उमेदवाऱ्या मिळवत आहेत. हेच उलट्या बाजूनेही घडत आहे. त्यामुळे सर्वच पक्ष सारखे अशी एक सार्वत्रिक भावना तयार झाली आहे. पक्षांच्या कार्यक्रमांऐवजी आपला त्या त्यावेळचा जो कोणी विरोधक असेल त्याच्यावर खालच्या पातळीवर उतरून वैयक्तिक टीका करणे म्हणजेच प्रचार असा समज त्यातून रूढ होतो आहे. संगमनेरच्या घटनेचा सर्व पक्षांनी निषेध केला. आता तरी त्यांनी थोडे शहाणे व्हावे. उरलेल्या काळातील प्रचार हा मुद्द्यांवर अधिक करावा. आपल्या विरोधी उमेदवारांच्या नावाने शिमगा करण्यामुळे टीव्हीवर प्रसिध्दी मिळते, सभांमध्ये टाळ्याही मिळतात. यांच्यातलेच काही जण निवडूनही येतात. पण या सर्वांमुळे लोकशाही आणि निवडणुका यांच्यावरचा लोकांचा विश्वासही आणखीनच कमी होत जातो. हे होणे समाज व देशाच्या हिताचे नाही.

विचार

# अर्थविश्वाची साद, दिवाळीचे पडसाद

*दिवाळीच्या पार्श्वभूमीवर स्मार्टफोन, इलेक्ट्रॉनिक आदी वस्तूंसाठी कर्ज काढण्याकडे लोकांचा कल वाढत असल्याचे चित्र अलिकडेच समोर आले. त्याच सुमारास प्राप्तिकर परतावा भरणाऱ्यांच्या संख्येत दहा वर्षांमध्ये दुप्पट वाढ झाली असल्याची आकडेवारी समोर आली. याच सुमारास महागाईवाढीमुळे रिझर्व्ह बँकेचे पतधोरण ग्राहकाभिमूख राहणे अवघड असल्याची शक्यता ऐकायला मिळाली.*



**महेश देशपांडे**

देशभर सर्वत्र दिवाळीचे वातावरण दाटत असताना आर्थिक आघाडीवरही लगबग पहायला मिळत आहे. त्यातल्या त्यात लक्षवेधी बातमी म्हणजे स्मार्टफोन, इलेक्ट्रॉनिक आदी वस्तूंसाठी कर्ज काढण्याकडे लोकांचा कल वाढतो आहे. त्याच सुमारास समोर येणारे एक निरिक्षण म्हणजे प्राप्तिकर परतावा भरणाऱ्यांच्या संख्येत दहा वर्षांमध्ये दुप्पट वाढ झाली आहे. याच सुमारास महागाईवाढीमुळे रिझर्व्ह बँकेचे पतधोरण ग्राहकाभिमूख राहणे अवघड असल्याची शक्यता ऐकायला मिळाली.

स्मार्टफोन आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू यांसारख्या गोष्टींवर भारतीय मोठ्या प्रमाणावर कर्ज घेत आहेत. अवघ्या चार वर्षांमध्ये भारतीयांचा खरेदीचा ट्रेंड कमालीचा बदलला आहे. अशा गोष्टींसाठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या ३७ पटींनी वाढली आहे. कोविड १९ नंतर खरेदीचा ट्रेंड पूर्णपणे बदलला आहे. एका अहवालानुसार, २०२० मध्ये स्मार्टफोन आणि गृहोपयोगी उपकरणांसाठी जेमतेम एक टक्का कर्ज घेतले जात होते. २०२४ मध्ये हा आकडा ३७ टक्क्यांवर पोहोचला आहे. आता ग्राहक त्यांच्या घरातील बदलांसाठी पैशांची व्यवस्था करण्याबाबत फारसा विचार करत नाहीत. कर्ज घेऊन ते ताबडतोब त्यांचा फोन आणि टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशिन अशा वस्तू खरेदी करत आहेत. 'होम क्रेडिट इंडिया'च्या 'हाऊ इंडिया बॉरोज' अहवालानुसार, लोकांमध्ये आपले घर आणि जीवनशैली सुधारण्याची तीव्र इच्छा आहे. सर्वाधिक कर्जे ही ग्राहकोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी घेतली जात आहेत. यानंतर व्यवसाय करण्यासाठी आणि घराला नवीन रूप देण्यासाठी कर्ज घेतले जात आहे. व्यवसाय विस्तारासाठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या २०२० मध्ये पाच टक्क्यांवरून २०२४ मध्ये २१ टक्क्यांवर पोहोचली आहे.

देशात व्यवसाय करण्याची भावना अधिक दृढ होत आहे. लोकांना नवीन संधी पाहून उत्पन्नाचे स्त्रोत वाढवायचे आहेत. सरकारने 'एमएसएमईं'ना दिलेल्या पाठिंब्यामुळेही याबाबत वातावरण निर्माण झाले आहे.

लोक शिक्षणापेक्षा लग्नासाठी जास्त कर्ज घेत आहेत. याशिवाय स्वप्नातील घर साकारण्याची इच्छाही लोकांमध्ये वाढली आहे. गृह सुधारणेसाठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या २०२२ मधील ९ टक्क्यांवरून २०२४ मध्ये १५ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. याशिवाय, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत कर्ज घेणाऱ्यांची संख्या याच कालावधीत सात टक्क्यांवरून तीन टक्क्यांवर आली आहे. याचे कारण चांगले आर्थिक नियोजन आणि वाढत्या आरोग्य सुविधा असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे, शिक्षणासाठी कर्ज घेणाऱ्यांच्या संख्येत कोणताही बदल झालेला नाही. ते अजूनही चार टक्के आहे. या काळात लग्नासाठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या तीन टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर पोहोचली आहे. देशातील १७ शहरांमध्ये याबाबत सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये टॉप ७ मेट्रो शहरांचाही समावेश आहे. सर्वेक्षणादरम्यान १८ ते ५५ वर्षे वयोगटातील सुमारे २५०० लोकांची मते घेण्यात आली. त्यांचे दरमहा सरासरी उत्पन्न ३१ हजार रुपये होते. आता ग्राहक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असल्याचे सर्वेक्षणात म्हटले आहे. बँकिंगसाठी त्यांनी ॲपचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे ऑनलाइन शॉपिंगमध्येही वाढ होताना दिसत आहे. 'ईएमआय' कार्ड लोकांमध्ये लोकप्रिय आहेत.

दरम्यान, प्राप्तिकर परतावा भरणाऱ्या लोकांच्या संख्येत गेल्या दहा वर्षांमध्ये दुप्पट वाढ झाली आहे. २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी एकूण तीन कोटी ७९ लाख ७४ हजार ९६६ प्राप्तिकर परतावे भरले गेले होते, ज्याची संख्या २०२३-२४ मध्ये आठ लाख ६१ लाख ३२,७७९ पर्यंत वाढली. म्हणजेच मोदी सरकारच्या गेल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात प्राप्तिकर परतावा भरणाऱ्यांची संख्या चार कोटी ८१ लाख ५७,८१३ ने वाढली आहे. म्हणजेच दहा वर्षांमध्ये प्राप्तिकर परतावा भरणाऱ्यांची संख्या १२७ टक्क्यांनी वाढली आहे. दहा वर्षांमध्ये प्राप्तिकर परतावा फाइल करणाऱ्यांमध्ये १३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी वेळ-मालिका डेटा जारी केला आहे. या आकडेवारीनुसार २०१३-१४ या आर्थिक वर्षात ३,५०,४३,१२६ वैयक्तिक करदात्यांनी प्राप्तिकर परतावा भरले होते. त्यांची संख्या २०२३-२४ मध्ये आठ कोटी, १३ लाख ९०,७३६ पर्यंत वाढली आहे. प्राप्तिकर परतावा भरणाऱ्या व्यक्ती श्रेणीतील करदात्यांची संख्या गेल्या दहा वर्षांमध्ये चार कोटी ६३ लाख ४७,६१० ने वाढली आहे. म्हणजेच गेल्या १० वर्षांत प्राप्तिकर परतावा भरणाऱ्यांची संख्या १३२ टक्क्यांनी वाढली आहे. विभागानुसार, २०१३-१४ मध्ये पॅन कार्ड धारण करणाऱ्यांची संख्या पाच कोटी २६ लाख ४४,४९६ होती, जी २०२३-२४ मध्ये वाढून दहा कोटी, ४१ लाख १३,८४७ झाली आहे. गेल्या दहा मूल्यांकन वर्षांमध्ये वैयक्तिक करदात्यांची संख्या शंभर टक्के म्हणजेच दुप्पट वाढली आहे. २०१४-१५ या आर्थिक वर्षात मोदी सरकार सत्तेवर आले, तेव्हा प्रत्यक्ष कर संकलन सुमारे ६.९६ लाख कोटी रुपये होते. २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये ती वाढून १९ लाख ६० हजार १६६ कोटी रुपये (१९.६० लाख कोटी) झाली आहे. म्हणजेच, मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात, प्राप्तिकर, कॉर्पोरेट टॅक्स आणि सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) बारा लाख ६४ हजार ३७४ कोटी रुपये म्हणजेच १८२ टक्के झाला आहे. एकूण कर महसुलात प्रत्यक्ष कराचा वाटा २०१३-१४ या आर्थिक वर्षात ५६.३२ टक्के होता. २०२३-२४ मध्ये तो ५६.७२ टक्के झाला. २००३-०४ या आर्थिक वर्षात एकूण कर महसुलात प्रत्यक्ष कराचा वाटा ४१.४२ टक्के होता.

आता आणखी एक लक्षवेधी बातमी. रिझर्व्ह बँकेने ९ ऑक्टोबर २०२४ रोजी चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीनंतर पतधोरण जाहीर करताना, रेपो दर ६.५० टक्के ठेवला; परंतु डिसेंबर २०२४ मध्ये होणाऱ्या चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीत रिझर्व्ह बँक आपले धोरण दर कमी करू शकते, असे संकेत देत समितीने आपली भूमिका तटस्थ ठेवली. १४ ऑक्टोबर रोजी किरकोळ महागाई दराची आकडेवारी जाहीर झाल्यानंतर, रिझर्व्ह बँक डिसेंबर महिन्यात रेपो दर कमी करेल अशी शक्यता फारच कमी आहे. भाज्यांच्या भाववाढीमुळे चिंता वाढली आहे. किरकोळ महागाई वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे खाद्यान्न महागाई दर सप्टेंबर महिन्यात ९.२४ टक्क्यांवर पोहोचला आहे, जो ऑगस्टमध्ये ५.६६ टक्के होता. सप्टेंबरमध्ये भाज्यांच्या महागाईचा दर ३५.९९ टक्के होता. तो ऑगस्टमध्ये १०.७१ टक्के होता. १४ ऑक्टोबर रोजी घाऊक महागाई दराची आकडेवारी जाहीर करण्यात आली. त्यानुसार सप्टेंबर २०२४ मध्ये घाऊक अन्न निर्देशांक ९.४७ टक्क्यांवर पोहोचला आहे. तो ऑगस्टमध्ये ३.२६ टक्के होता. घाऊक महागाई दराच्या आकडेवारीनुसार सप्टेंबरमध्ये भाज्यांच्या महागाईचा दर ४८.७३ टक्के होता. बटाट्याचा महागाई दर ७८.१३ टक्के तर कांद्याचा ७८.८२ टक्के आहे.

अन्नधान्य आणि भाजीपाला महागाईपासून लवकर दिलासा मिळण्याची शक्यता फारच कमी असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. किरकोळ चलनवाढीच्या उघड झालेल्या आकड्यांचा परिणाम पतधोरण समितीच्या व्याजदर कमी करण्याच्या निर्णयावर होऊ शकतो, असेही तज्ज्ञांचे मत आहे. 'मिलवूड केन इंटरनॅशनल'चे संस्थापक आणि 'सीईओ' निश भट्ट यांच्या मते अन्नधान्य चलनवाढीमुळे किरकोळ महागाईमध्ये वाढ झाली आहे. असामान्य मॉन्सूनमुळे देशातील अनेक भागात पिकांचे नुकसान झाले आहे. कोर महागाईदेखील ३.५ टक्के आहे. ती अपेक्षेपेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत पतधोरण समितीच्या व्याजदरांबाबत घेतलेल्या निर्णयावर किरकोळ चलनवाढीच्या आकडेवारीचा परिणाम दिसून येतो. महागाई कमी होत नाही, तोपर्यंत व्याजदरात कपात होण्याची शक्यता फारच कमी असते. 'नाइट फ्रँक इंडिया'चे राष्ट्रीय संचालक संशोधन विवेक राठी यांच्या मते किरकोळ महागाईतील वाढ ही घरगुती महागाई वाढण्याच्या अपेक्षेनुसार आहे. सध्या भारतातील चलनवाढीचा दर जागतिक ट्रेंडपेक्षा वेगळा आहे, जेथे महागाई कमी झाल्यामुळे तिथली सेंट्रल बँक व्याजदरात कपात करत आहे; पण भारतातील चलनवाढीची परिस्थिती लक्षात घेता रिझर्व्ह बँक घाईघाईने व्याजदरात कपात करेल अशी शक्यता फार कमी आहे.

आजकाल

# सामान्य वीज ग्राहकांसाठी लढा देणाऱ्यांचा रास्त गौरव

**समीर मणियार**

विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या असल्या तरी राज्य सरकारच्या अखत्यारीतील महावितरण कंपनीच्या कारभारामुळे दोन कोटीहून अधिक सामान्य घरगुती वीज ग्राहक कमालीचे हैराण व परेशान आहेत. वीज दरातील अस्मानी वीज दरवाढ आणि येणारे महाकाय वीज देयके यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहक कमालीचे हैराण आहेत. अशा बिकट प्रसंगात गेली काही दशके सामान्य वीज ग्राहकांसाठी राज्य सरकार, राज्य वीज नियामक मंडळाच्यासह विविध फोरमवर आवाज उठविणारे समाजवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते, कृतीशील विचारवंत प्रतापराव होगाडे यांना यंदा २०२४ सालचा कॉम्रेड दत्ता देशमुख गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार विशिष्ट ध्येयासाठी सतत संघर्ष करणाऱ्या लढाऊ व्यक्तीमत्वास जाहीर झाला ही आनंदाची गोष्ट आहे. प्रतापराव होगाडे यांचे हार्दिक अभिनंदन.

जीवनावश्यक वस्तू आणि सेवांचे दर वाढत असून, महागाईला निमंत्रण देणाऱ्या अशा निर्णयामुळे सामान्य मध्यमवर्गीयांचे कंबरडे मोडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. वीज ग्राहकांपेक्षा अदानी, अंबानी यांचे हित जोपासण्यात राज्यकर्त्यांना बरे वाटते. गेल्या काही महिन्यांतील वीज बिलांची रक्कम आणि सतत वाढणारे वीज दर यांची न्यायसंगत तर्कसंगत लागत नाही. केंद्र सरकारने एक कायदा करुन वीज दराबाबत निर्णय घेण्याचे कायदेशीर अधिकार प्रत्येक राज्यातील वीज नियामक मंडळाला बहाल केले आहेत. मात्र यात सामान्य घरगुती वीज ग्राहकांच्या हिताचा व रास्त हक्कांचा किती विचार होतो असा लाखमोलाचा प्रश्न आहे.

महावितरण कंपनीची वीज गळती, वाढीव चुकीची बिले दुरुस्त करुन घेताना वीजग्राहकांना होणारा मनस्ताप मोठा आहे. अशा परिस्थितीत वीज क्षेत्रातील तज्ञ आणि महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रतापराव होगाडे यांचा अवास्तव वीज दरवाढीच्या विरोधात कायदेशीर संघर्ष मोठा आहे. त्यांच्या या कार्यास सलाम.

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर शहरातील कॉम्रेड दत्ता देशमुख पुरोगामी विचार मंचच्या पदाधिकारी यांची नुकतीच बैठक झाली. यात सन-२०२४ चे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यंदाचा कॉम्रेड दत्ता देशमुख गौरव पुरस्कार समाजवादी चळवळीतील कृतीशील विचारवंत तथा राज्य वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रतापराव होगाडे यांना जाहीर झाला आहे. रोख ५१ हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

कॉम्रेड दत्ता देशमुख हे महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेचे अध्यक्ष होते. ते डाव्या चळवळीचे ज्येष्ठ नेते म्हणून महाराष्ट्रात त्यांची ओळख आहे. विधानसभेत आमदार या नात्याने त्यांनी पाणी प्रश्न, कामगारांच्या प्रश्नावर राज्याच्या विधानसभेत केलेले भाषणे उल्लेखनीय आहेत.

सामाजिक चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती मेघा पानसरे यांना प्रोत्साहन पुरस्कार रु. २१ हजार, मानपत्र व स्मृतिचिन्ह, तर कॉ. दत्ता देशमुख कृतज्ञता पुरस्कार हा कै. माधव वरवडेकर आणि कै. अशोक झोपे यांना जाहीर करण्यात आला. रु.११ हजार, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. लवकरच पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करुन वरील मान्यवर व त्यांच्या कुटुंबियांना या पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, कॉम्रेड दत्ता देशमुख पुरोगामी विचार मंचावर विश्वस्त म्हणून ज्येष्ठ पत्रकार, माजी खासदार कुमार केतकर यांची विश्वस्त म्हणून निवड करण्यात आली आहे. राज्यातील सुमारे दोन कोटी घरगुती वीज ग्राहकांच्या घरगुती वीज वापराची बिले ग्राहकांच्या अंदाजापेक्षा जास्त आलेली आहेत. त्यामुळे प्रचंड संभ्रम व असंतोष निर्माण झालेला आहे. घरगुती वीज ग्राहकांच्या वीज दरात वाढ झालेली आहे. वीज बिलांतील स्थिर आकार, वीज वहन आकार यात वाढ झालेली आहे. चुकीचा अवाढव्य इंधन समायोजन आकार प्रति युनिट मूळ सरासरी देयक दरात समाविष्ट करण्यात आला. सर्वसामान्य वीज ग्राहकांवर लादण्यात आलेल्या महावितरण कंपनीच्या वाढीव दरवाढीच्या विरोधात महावितरण कंपनी सोयीस्कर मौन धारण करते असा प्रतापराव होगाडे यांचा आक्षेत आहे. महावितरण कंपनीच्या बिलांचा मुख्य कार्यालयाचा सॉफ्टवेअर प्रोग्राम बरोबर आहे. स्थानिक कार्यालय फक्त मीटर रिडिंगचा आकडा व रिडिंगची तारीख देते वा ग्राहक क्रमांकानुसार माहिती भरते. यामध्ये काही चूक झाली तर चुकीचे बिल येऊ शकते. अशीही काही चुकीची बिले झालेली आहेत. अशा वीज ग्राहकांना लेखी तक्रार नोंद करुन बिले दुरुस्त करुन घ्यावी लागतात. वाढत्या व अवास्तव वीज बिलांमुळे घरगुती वीज ग्राहक हैराण आहेत. वीज ग्राहकांच्या समस्यांचे वेळेत निराकरण केले जात नाही. महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी सामान्य वीज ग्राहकांशी चांगले वागत नाही अशा तक्रारी आहेत.

ऊर्जा मंत्र्यांना सामान्य वीज ग्राहकांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. वीज पुरवठा खंडित झाला अथवा त्यासंबंधीच्या तक्रारीसाठी योग्य यंत्रणा कार्यान्वित नाही. अवाडव्य वीज बीलामुळे मेटाकुटीला आलेल्या वीज ग्राहकांचे प्रश्न मांडून त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रतापराव होगाडे व त्यांचे सहकारी कार्यकर्ते करीत असलेल्या प्रामाणिक प्रयत्नांचा रास्त गौरव कॉम्रेड दत्ता देशमुख गौरव पुरस्कारमुळे जाहीर झाला आहे. पुन्हा एकदा प्रतापराव यांचे मनापासून अभिनंदन.

(साभार)

## लोकसंसद

### भावी आमदारांना आवाहन

येत्या २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होणार आहे. आपल्या अलिबागमधून जी कोणी व्यक्ती आमदार म्हणून निवडून येईल, त्या व्यक्तीने खालील प्रश्न सोडवावे, अशी माझी (श्रीकांत रघुनाथ भातखंडे, जन्म आवास, गाव नागाव, सध्या घर अलिबागमध्ये) नम्र विनंती आहे.

१) प्रकल्पासाठी रेल्वे लाइन येऊन चाळीसएक वर्ष झाली पण त्याचा अलिबागच्या आणि आजूबाजूच्या गावांतील जनतेच्या प्रवासासाठी उपयोग करून घेण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. ही रेल्वे लाइन ज्या ज्या गावांजवळून जाते, त्या त्या गावांसाठी गावाजवळ रेल्वे स्थानक बांधून लवकरात लवकर पॅसेंजर/लोकल रेल्वे सुरू करावी, यासाठी प्रयत्न करावेत. अशीच लोकल रेल्वे पनवेलपासून जेथे जेथे संपूर्ण रायगड जिल्ह्यात, तसेच कोकणात रेल्वे लाइन गेली आहे, त्या रेल्वे लाइनवरील सर्व गावांजवळ रेल्वे स्थानक बांधून सुरू करण्यात यावी. तरच त्या कोकण रेल्वेचा खऱ्या अर्थाने थोडासा तरी ह्या रेल्वे लाइनवरील गावातील जनतेला उपयोग झाला असे म्हणता येईल.

२) सर्व एसटी स्थानकांवर बस लागल्यावर प्रवाशांना बसमध्ये सुखरूप चढता यावे यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. त्याची सुरुवात अलिबाग डेपोपासून करावी. ३) अलिबाग डेपोला चांगल्या बसेस उपलब्ध करून देणे. ४) पनवेल-रेवस, पनवेल-हाशिवरे मार्गे, पनवेल-सासवणे-पनवेल, पनवेल-किहीम-पनवेल, पनवेल-रेवदंडा-पनवेल, पनवेल-कार्लेखिंड-पनवेल तसेच साळाव, गोठी वगैरे जी गावे आहेत त्या सर्व गावांसाठी मिळून पनवेल बस, अशा एसटीच्या बारमाही बसेस सुरू करणे गरजेचे आहे.

५) अलिबाग तालुक्यातील जी गावे अलिबागपासून लांब आहेत, अशा ठिकाणी चार-पाच गावांसाठी मिळून एक छोटे सात-आठ बेडचे सुसज्ज सरकारी रुग्णालय बांधावे जेणेकरून तेथील जनतेला तिथल्या तिथे वैद्यकीय सुविधा उपलब्ध होईल आणि त्यामुळे काही काही उपचारांसाठी अलिबागला धावावे लागणार नाही.

६) पेण-वडखळ रस्ता कायमस्वरूपी चांगला करणे. मला खात्री आहे की यावेळी खेपेस निवडून येणारे आपले आमदार वरील प्रश्न सोडविण्यासाठी यशस्वी प्रयत्न करतील.

**- श्रीकांत भातखंडे, अलिबाग (९८६७३८९०३८)**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२८ ऑक्टोबर**

१८८१:- लेखक, अनुवादक देवीदास भास्कर लेले यांचा जन्म. डॉ. ॲनी बेझंट यांच्या पुस्तकाचा 'मुमुक्षुमार्ग' हा अनुवाद तसेच 'सानंदाचे साम्राज्य व इतर प्रवचने' ही त्यांची पुस्तके होत १८९०:- ज्ञानेश्वरीचे अभ्यासक दात्रेय व्यंकटेश केतकर यांचा जन्म. 'जान्हवी टीकेसह ज्ञानेश्वरी', 'जिज्ञासोद्यान (ज्ञानेश्वरीतील शब्दसंशोधन)','ज्ञानेश्वर - ५५ दुर्गम स्थलांचे अर्थ' ही पुस्तके, तसेच वडील ज्योतिषाचार्य व्यं. बा. केतकर यांचे चरित्र त्यांनी लिहिले १८९३:- कवी गिरीश तथा शंकर केशव कानेटकर यांचा जन्म. रविकिरण मंडळातील ते एक प्रमुख कवी होते. 'बालगीत' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह, तर 'कांचनगंगा','फलभार','चंद्रलेखा','सोनेरी चांदणे' हे नंतर प्रकाशित झालेले संग्रह. त्यांच्या आणि कवी यशवंतांच्या कवितांचे एकत्रित 'वीणाझंकार' व 'यशोगौरी' हे संग्रह आहेत.

'पोर खाटेवर मृत्युच्याच दारा' ही गाजलेली कविता गिरीश यांचीच. 'मराठी नाटयछटा','माधव ज्यूलिअन यांचा 'स्वप्नलहरी' तसेच रेव्हरंड ना. वा. टिळक यांचे 'ख्रिस्ताय' या ग्रंथांचे संपादन त्यांनी केले होते. १९०० :- संपादक, साहित्य समीक्षक डॉ. रामकृष्ण गणेश हर्षे यांचा जन्म. 'गोविदाग्रज' हा काव्च परीक्षणात्मक, 'टीका आणि अभ्यास' मधून साहित्यविषयक चर्चा आणि ग्रंथपरीक्षणे, 'भावगीत' मधून भावगीत या वाङ्‌मय चर्चा आणि 'ज्ञानदेवी अध्याय पहिला' हे पुस्तक अशी साहित्य संपदा. १९१६:- लेखक शंकर जनार्दन जोशी यांचा जन्म. ह्यांनी 'आत्माराम रावजी भट : व्यक्ती आणि कार्य' या चरित्रवजा ग्रंथासह अर्थ, व्यापारी महाराष्ट्र संपदा मधून अर्थविषयक लेखन केले आहे. १९१९:- ललित वाङ्‌मय, नाटय, संगीत, अध्यात्म आदी विषयांचे जाणकार लेखक विनायक भास्कर ताम्हणकर यांचा जन्म. 'मुक्ताऽनंद चांगदेव' हा त्यांचा चांगदेवाचे व्यक्तिचित्रण करणारा ग्रंथ स्वामी स्वरुपानंद यांनी रचिलेल्या 'अभंग चांगदेव पासष्टी' या काव्यरचनेवर आधारित आहे.१९३१:- जगातील चार श्रेष्ठ द्रुत गणितीपैकी एक अशा सन्मानाने अमेरिकन विद्यापीठाने गौरवलेले गणिती आणि या विषयावरील लेखक श्याम मराठे यांचा जन्म. त्यांचे 'गणितातील दुर्मिळ जादू','गणितातील गंमतीजंमती', 'द्रुत गणित','प्राचीन भारतीय गणितींची गणितातील प्रगती','भारतीय द्रुत गणितांच्या अद्भूत रीती' अशी पुस्तके प्रसिध्द १९४३:- पाककला कृतीसह मराठी साहित्याचे दालन सजवणाऱ्या निशा अरुण लिमये यांचा जन्म. 'चौपाटी फुड' या पुस्तकातून समुद्राकाठी चौपाटीवर मिळणाऱ्या पदार्थांची माहिती तर बिघडलेला पदार्थ कसा सुधारायचा यावर बेतलेले 'किचन क्विन होण्यासाठर गृहिणींना टिप्स' या पुस्तकासह वृत्तपत्रे, साप्ताहिक, मासिके यातून पाककलेविषयी लेखन केले आहे१९४४:- लेखक प्रा. डॉ. शरद वासुदेव खरे यांचा जन्म. 'मध्यम वर्गाचे औदासिन्य' हे वैचारिक स्वरुपाचे पुस्तक त्यांनी लिहिले आहे १९८१:- लेखक मनोहर सोविंदाजी नगरकर यांचा जन्म. 'मनोहर भजनावली' हा मराठी भजनसंग्रह आणि 'कहे मनोहर' हा हिंदी भजनसंग्रह प्रसिध्द.

**- संजय वझरेकर ९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२८ ऑक्टोबर

१) श्रीम. शैलजा धुडीराज लेले
बालाजीनाका, अलिबाग
२८-१०-१९३६

२) श्री. गजानन विनायक जोशी
चेंढरे-अलिबाग
२८-१०-१९६१

३)श्री. संतोष रामकृष्ण वाकडे
पंतनगर, अलिबाग
२८-१०-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावावा

## जिल्हाधिकारी किसन जावळे यांचे आवाहन

**। उरण । वार्ताहर ।**

लोकशाही मजबूत बनविण्यासाठी आपण मतदान करणे गरजेचे आहे. मत आपला अधिकार आहे, तशीच आपली जबाबदारीदेखील आहे. म्हणूनच प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे नितांत गरजेचे असल्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी सांगितले.

१९० उरण विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी उरण जासई येथील निवडणूक केंद्राला नुकतीच भेट दिली, तसेच निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ. उद्धव कदम, शासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते.



उरण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार यांनी ही निवडणूक प्रक्रियेसंदर्भात मतदान अधिकारी व निवडणूक प्रक्रियेतील कर्मचारी यांना निवडणूक प्रक्रिया व मतदान केंद्र संदर्भात प्रशिक्षण दिले. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ. उद्धव कदम, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी समीर वाठारकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी समीर जाधव, पोलीस अधिकारी व कर्मचारी ही उपस्थित होते.

# मतदानवाढीसाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत जनजागृती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार १८९ कर्जत विधानसभामतदारसंघाचीनिवडणूक (२० नोव्हेंबर) रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून, दिनांक २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या मतदारसंघात एकूण ३६२ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडण्यात येणार आहे.




दि. ३० जून रोजी प्रसिद्ध झालेल्या मतदार यादीनुसार कर्जत विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख १३ हजार ८८४ मतदार भाग घेणार आहेत. त्यापैकी पुरुष मतदारांची संख्या १ लाख ५७ हजार २१८ आहे. महिला मतदार १ लाख ५६ हजार ६६१ आहेत, तर ५ तृतीय पंथी मतदारांचा समावेश आहे. मतदारसंघातील आचारसंहितेचा भंग होणार नाही, यासाठी सर्व यंत्रणांच्या बैठका घेऊन करावयाच्या कार्यवाहीबाबत निर्देशित केले आहे. निवडणूक प्रक्रिया सुलभ आणि कायदा व सुव्यवस्थेचा कुठलाही प्रश्न निर्माण न होता पार पाडण्याच्या दृष्टीने विविध पथकांची स्थापना करण्यात आली आहे. मतदारसंघांच्या सीमांवर चेक पोष्टची उभारणी करण्यात आली आहे. तसेच २४ टोल फ्री क्रमांक १९५० कार्यान्वित करण्यात आला आहे. १८९ कर्जत विधानसभा मतदारसंघासाठी दि. २२ ऑक्टोबरपासून नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय नवीन प्रशासकीय भवन येथे स्वीकारण्यात येतील.

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कर्जत मतदान करा, असे आवाहन असे प्रसिध्दी पत्रकाद्वारे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी जाहीर केले आहे.

# ज्वेलर्सची दुकाने फोडून दागिने लंपास

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील तालुक्यातील ओणी बाजारपेठेतील ज्वेलर्सची दोन दुकाने फोडून चोरट्यांनी सुमारे १ लाख ६५ हजारांचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महामार्गावर ओणीसारख्या वसलेल्या बाजारपेठेत चोरी झाल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, ओणी बाजारपेठेत खरवते येथील सूर्यकांत सागवेकर आणि चुनाकोळवण येथील रवींद्र देवरुखकर यांची ज्वेलर्सची दुकाने आहेत.

# तपासणी नाक्यावर मद्यसाठा जप्त

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

दोडामार्ग सीमा तपासणी नाक्यावर गोवा बनावटीच्या दारू वाहतुकीवर अतिरिक्त पोलीस अधीक्षक कृषिकेश रावले यांनी शनिवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास कारवाई केली. यावेळी २३ हजार ६०० रुपयांचा मद्यसाठा जप्त करण्यात आला. अशा गैरप्रकारांवर आळा बसविण्यासाठी येथील नाक्यावर यापुढे आणखी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

दोडामार्ग तालुका हा महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक या तीन राज्यांचा सीमेवर वसला आहे. दोडामार्गमधून तिन्ही राज्यांमध्ये अनेकांची दररोज वर्दळ सुरू असते. सध्या विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्याने आचारसंहिता सुरू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील दोडामार्ग, आयी, विजघर यांसह सहा सीमा तपासणी नाक्यांवर पोलीस, उत्पादन शुल्क व इतर विभागाचे कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांनी शुक्रवारी दोडामार्गमध्ये येत येथील परिस्थितीचा आढावा घेतला. कृषिकेश रावले यांनी शनिवारी दोडामार्ग चेकपोस्टला भेट दिली. यावेळी त्यांनी सर्व वाहने थांबवून कसून तपासणी करण्याच्या सूचना पथकाला दिल्या होत्या.

# राजापूर मतदारसंघात तिरंगी सामना

## ■ राजन साळवी, किरण सावंत, अविनाश लाड निवडणुकीच्या रिंगणात

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात लांजा राजापूर विधानसभा मतदारसंघ हा चर्चेत आला असून, याठिकाणी उद्धव ठाकरे यांचे शिलेदार आमदार राजन साळवी यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. या मतदारसंघात शिंदेंच्या शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांचे ज्येष्ठ बंधू किरण सामंत या नव्या भिडूसोबत साळवींचा सामना रंगणार आहे. यातच काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अविनाश लाड यांनीही याच मतदारसंघात अपक्ष उमेदवारी भरून महाविकास आघाडीतील नाराजीला वाचा फोडली आहे. आता कोणत्याही परिस्थितीत निवडणुकीतून माघार नाही, असा पवित्राच अविनाश लाड यांनी घेतला आहे. त्यामुळे विद्यमान आमदार राजन साळवी यांच्यासमोर यंदा दुहेरी आव्हान असणार आहे.



गेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार साळवी यांच्याविरोधात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अविनाश लाड यांचा निसटता पराभव झाला होता. काँग्रेसचे उमेदवार अविनाश लाड यांना गेल्या विधानसभा निवडणुकीत याच मतदारसंघातून ५३ हजार ५५७ तर आमदार राजन साळवी यांना ६५ हजार ४३३ इतकी मते मिळाली होती. राजन साळवी यांनी ११ हजार ८७६ मतांनी आघाडी घेत अविनाश लाड यांना पराभवाची धूळ चारली होती. त्यामुळे गेल्या विधानसभा निवडणुकीतील ही आकडेवारी पाहता राजन साळवी यांच्यासमोर पुन्हा एकदा अविनाश लाड यांचे तगडे आव्हान असणार आहे. तर महायुतीकडूनही किरण सामंत रिंगणात आहेत. अशा दुहेरी परीक्षेला साळवींना सामोरे जावे लागणर आहे.

लांजा राजापूर विधानसभा मतदारसंघाची जागा काँग्रेसला सुटावी यासाठी अविनाश लाड यांनी आग्रह धरला होता. इतकेच नाहीतर ठाकरे गटाचे शिलेदार विद्यमान आमदार राजन साळवी यांच्याविरोधात त्यांनी अनेकदा उघडपणे भूमिका घेतली होती. रिफायनरी प्रकल्प व अणुऊर्जा प्रकल्प या प्रकल्पांच्या संदर्भात स्थानिक आ. राजन साळवी यांच्या भूमिकेवर अविनाश लाड यांनी यापूर्वी अनेकदा आक्षेप घेतला होता.

आता या सगळ्याचे पडसाद थेट विधानसभा निवडणुकीत उमटताना पाहायला मिळणार आहेत. गुरुवारी अविनाश लाड यांनी अपक्ष फॉर्म भरताना आपल्याला काँग्रेस पक्ष २९ ऑक्टोबरपर्यंत म्हणजेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत एबी फॉर्म देणार, असा विश्वास व्यक्त केला होता. तर आपण आता निवडणुकीतून कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे. हा स्थानिक भूमीपुत्रांचा लढा आहे आणि मी भूमीपुत्र आहे असेही लाड म्हणाले आहेत. त्यामुळे आता ठाकरे गटाचे उमेदवार विद्यमान आमदार राजन साळवी यांना महाविकास आघाडीतील नाराजीला तोंड द्यावे लागण्याची चित्र आहे.

# टाळसुरे गावाचा फटाकेबंदीचा संकल्प

## प्रदूषण रोखण्यासाठी एकमुखी निर्णय



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

दीपोत्सव म्हणजे दिव्यांचा सण... आनंदाचा क्षण. दिवाळीत नवे कपडे, फराळची रेलचेल असते. जोडीला असते ती फटाक्यांची आतषबाजी. फटाक्यांमुळे क्षणिक आनंद मिळतो. मात्र, त्यातून ध्वनी प्रदूषण, हवा प्रदूषण होते. ते रोखण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीतील एका गावाने फटाकेबंदीचा एकमुखी निर्णय घेतला. वाढते प्रदूषण, तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय कौतुकाचा, चर्चेचा विषय ठरला आहे.

दापोलीतील टाळसुरे ग्रामपंचायतीने ‘माझी वसुंधरा ०.५’ मोहीम यशस्वी करण्याचा संकल्प केला आहे. या मोहिमेंतर्गत जनजागृती उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्याअंतर्गत फटाकेबंदीचा निर्णय घेण्यात आला असून, गावातील प्रत्येक वाडी-वस्तीवर जाऊन फटाकेबंदीबाबत जनजागृती करण्यात येत आहे. गावात फटाके फोडण्यास आणि विक्री करण्यासही बंदी आहे. याबाबतच्या जनजागृती फेऱ्यांमध्ये विद्यार्थी, महिला सहभागी होत आहेत. या मोहिमेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती टाळसुरे ग्रामपंचायत अधिकारी दिनेश मर्चंडे यांनी दिली.

गावच्या सरपंच पूर्वा सकपाळ, उपसरपंच विकास जाधव, ग्रामपंचायत सदस्य, गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या मार्गदर्शनाखाली फटाकेबंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे, असे गावचे तंटामुक्ती अध्यक्ष जयवंत जालगावकर यांनी सांगितले.

ध्वनी, हवा प्रदूषण रोखण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे. फटाक्यांवर होणाऱ्या खर्चातून शैक्षणिक साहित्य, कपडे खरेदी आणि गरजू व्यक्तींना मदत करण्याचा संकल्प गावाने केला आहे. त्यास उत्तम प्रतिसाद मिळत असून, या उपक्रमाद्वारे चांगला सामाजिक संदेश जनतेपर्यंत पोहोचत असल्याचे ग्रामपंचायतीने म्हटले आहे.

# युवक काँग्रेस अध्यक्षपदी मंगेश मोरे

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान शहर युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी मंगेश मोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. यावेळी कर्जत तालुका अध्यक्ष संजय गवळी, मनीष राणे, सूरज पंडित, काँग्रेसच्या आशा कदम, माथेरान शहर अध्यक्ष विजय कदम, किशोर हे उपस्थित होते.

मंगेश मोरे हे राजकारणात सक्रिय असून, त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. प्रत्येक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमात नेहमीच हिरीरीने सहभाग घेत असतात. आगामी काळात त्यांच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाला नक्कीच उभारी मिळू शकते, असा विश्वास समस्त काँग्रेस कार्यकर्त्यांना आहे. मंगेश मोरे यांची युवक काँग्रेसचे अध्यक्षपदावर नियुक्ती झाल्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# चिकणी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील चिकणी येथील डॉ. मानसी दिवेकर यांच्या दिर्घायु हेल्थ केअर (बोर्ली) व खोपोली येथील माधवबाग हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने चिकणी येथील प्रकृती स्टॉपजवळील भिकेश दिवेकर यांच्या निसर्ग फॉर्म हाऊस येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.



यावेळी माधवबाग हॉस्पिटलचे डॉ. सिद्धेश महाडिक व त्यांच्या टीमने तालुक्यातील पंचक्रोशितील लोकांची ईसीजी, रँडम ब्लड शुगर, ब्लडप्रेशर, वजन, उंची, हॉर्टरेट तपासणी करून आहार व व्यायाम याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी निवृत्त पोलीस अधिकारी गुरुनाथ माळी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. तालुक्यातून तसेच पंचक्रोशीतील शंभरहून अधिक जणांनी या शिबिराचा लाभ घेतला.

# आ. योगेश कदमांच्या संपत्तीत घसघशीत वाढ

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोकणातील काही प्रमुख लढतींमध्ये शिवसेनेचे नेते, माजी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांचे सुपुत्र योगेश कदम यांचा समावेश आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली खेड मंडळ विधानसभा मतदारसंघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ते महायुतीचे उमेदवार म्हणून रिंगणात आहेत. योगेश कदम यांनी उमेदवारी अर्जासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्रात आपल्या मालमत्तेची गुंतवणुकीची माहिती दिली आहे.

दोन दिवसांपूर्वी त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. अजित थोरबोले यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या उमेदवारी अर्जासोबत त्यांनी दिलेल्या प्रतिज्ञापत्रात ही माहिती देण्यात आली आहे. पाच वर्षांमध्ये आ. योगेश कदम यांच्या जंगम मालमत्तेत ४ कोटी ६३ लाख, स्थावर मालमत्तेत ३९ कोटी ३१ लाख रुपयांची वाढ झाल्याचे दिसत आहे. पण, याच वेळी कर्जातही ११ कोटी ५२ लाख रुपयांची वाढ झाली आहे.



योगेश कदम यांच्या मालकीची ७ कोटी रुपयांची तर त्यांच्या पत्नीच्या नावे ६ कोटी ६० लाख ९९ हजार रुपये, मुलांच्या नावे ३९ लाख ७० हजार ६६ रुपये किमतीची जंगम मालमत्ता आहे. जंगम मालमत्तेत रोख रुपये ८ लाख ९९ हजार, बँकेमधील गुंतवणूक व शेअर्समधील गुंतवणूक ३ कोटी ६९ लाख ८१९ रुपये असून ३३ लाख ५० हजार रुपये किमतीची वाहने आहेत. १ कोटी ४३ लाख ५४ हजार रुपये इतके सोन्याचे दागिने आहेत. कुटुंबाची एकत्रित जंगम मालमत्ता १४ कोटी १ लाख ५ हजार ४२१ इतकी आहे.

योगेश कदम यांच्या नावे शेतजमीन, बिगरशेतजमीन, व्यावसायिक व निवासी अश्या स्थावर मालमत्तेची एकूण किंमत ४१ कोटी ९८ लाख २८ हजार इतकी आहे. कदम व त्यांच्या कुटुंबियांनी १५ कोटी ७० लाख ३३ हजार इतक्या रक्कमेचे कर्ज घेतले आहे. योगेश कदम यांनी २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात दाखल केलेल्या आयकर विवरण पत्रात ८३ लाख ९६ हजार २६० इतके उत्पन्न दाखविले असून त्यांच्या पत्नीचे उत्पन्न १८ लाख ७९ हजार ३८० इतके आहे.

योगेश कदम यांनी शेती, सल्लागार आणि भूविकासक असे व्यवसाय करत असून पत्नी सिनेमा निर्माता असल्याची माहिती या प्रतिज्ञापत्रात दिली आहे.

## रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे मॅरेथॉन स्पर्धा

# एक धाव महिला सुरक्षेसाठी...

**। पनवेल । वार्ताहर ।**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल गेली पस्तीस वर्षे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर, पनवेल ग्रामीण तसेच रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यात सामाजिक कार्य करीत आहे. त्या अंतर्गत रविवार, दि.१७ नोव्हेंबर रोजी पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे महिलांसाठी एक धाव महिला सुरक्षेसाठी रोटरी मॅरेथॉन २०२४ चे आयोजन करण्यात आल्याची माहिती रोटरीचे अध्यक्ष शैलेश पोटे यांनी दिली.




यावेळी रोटरीचे डॉ. गिरीश गुणे, प्रोजेक्ट चेअरमन ऋषिकेश बुवा, अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, प्रसिद्धी विभागाचे संतोष घोडींदे, रोटरी ॲन्स वृषाली पोटे, ज्योती गडगे आदी उपस्थित होते. या उपक्रमाबाबत माहिती देताना प्रोजेक्ट चेअरमन ऋषिकेश बुवा यांनी सांगितले की, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे पनवेल शहरात उभारलेले महत्त्वाचे प्रकल्प म्हणजे बल्लाळेश्वर गणेश विसर्जन तलाव, रोटरी घनदाट जंगल, १५००० विद्यार्थिनींचे मोफत रुबेला लसीकरण, २००० विद्यार्थिनींचे अनेमिया तपासून त्यांना लोहयुक्त गोळ्यांचे वाटप व आहाराविषयी मार्गदर्शन, पॉसिटीव्ह हेल्थ या प्रोजेक्ट अंतर्गत ग्रामीण भागातील ५००० रुग्णांचे रक्त व रक्तदाब तपासणी करून त्यांना आहार मार्गदर्शन करण्यात आले.

श्रीवर्धन, म्हसळा, रोहा, मुरुड या तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन पोलिओ लसीकरण मोहिमेत शासकीय कर्मचाऱ्यांना सहकार्य करून जनजागृती करून पोलिओ निर्मूलनासाठी सहभाग, पनवेल तालुक्यातील अनेक शाळेत हॅपी स्कूल प्रकल्पांतर्गत विविध साहित्य वाटप, काही शाळांतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी, पनवेल तालुक्यातील विविध आदिवासी वाड्यावर पाण्यासाठी छोटे बंधारे व कुपनलिका (बोअरवेल) तयार करून दिल्यात, रोटरी ग्राम सभा योजनेंतर्गत मोहो, कोंबलटेकडी ही गावे दत्तक घेऊन काही समजोपयोगी कामे केली आहेत.

या उपक्रमाची माहिती देताना डॉ. गिरीश गुणे यांनी सांगितले की, दोन गटामध्ये हा उपक्रम घेण्यात आला असून, त्यामध्ये ३ किलोमीटर धावण्यासाठी ४५० रुपये प्रवेश फी आहे. तर ५ किलोमीटर धावण्यासाठी ६५० रुपये प्रवेश फी आहे. यामध्ये सहभाग घेणाऱ्या स्पर्धकांना टी-शर्ट, मेडल, ब्रेकफास्ट आदी उपलब्ध राहणार आहे. या उपक्रमाचे प्रायोजक ओरियन मॉल हे आहेत. यासाठी शालेय विद्यार्थिनीसुद्धा सहभाग घेऊ शकतात. तसेच ज्येष्ठ नागरिक आणि सेलिब्रीटींसाठी एक किलोमीटरची स्पर्धासुद्धा ठेवण्यात आली आहे. तरी या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# लाखोंची गावठी दारु जप्त

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर चिपळूण तालुक्यात लाखोंची हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली आहे. चिपळूण, सावर्डा व शिरगाव पोलिसांमार्फत ठिकठिकाणी हातभट्टीवर धाडी टाकून ही कारवाई करण्यात आली. यामध्ये लाखोंचा ऐवज जप्त झाला असून, अनेकांवर गुन्हेदेखील दाखल करण्यात आले आहेत.



तालुक्यातील वहाळ कोष्टेवाडी येथे एका हातभट्टीवर धाड टाकून सावर्डे पोलिसांनी १ लाख १२ हजार रूपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी एका महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धाड २४ ऑक्टोबर रोजी पोलीस शिपाई सारिका जाधव यांनी टाकली. यामध्ये गावठी हातभट्टीची दारू गाळत असताना एका महिलेला रंगेहाथ पकडण्यात आले. यामध्ये १ हजार १०० लीटर कुजके रसायन व दारू गाळण्याचे साहित्य असा १ लाख १२ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला. शिरगाव पोलीस ठाण्यांतर्गत पोलिसांनी केलेल्या कारवाईत एकाकडे विनापरवाना एक हजार रूपयांची हातभट्टीची दारू आढळून आली आहे. याप्रकरणी सीताराम शिर्के (रा. पोफळी शिर्केवाडी) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तालुक्यातील नारदखेरकी येथे हातभट्टीची दारू गाळत असताना चिपळूण पोलिसांनी एकाला रंगेहाथ पकडले आहे. प्रसाद अनंत हळदणकर असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून ८६ हजार रूपयांचा ऐवज जप्त केला आहे. अधिक तपास चिपळूण पोलीस करीत आहेत.

निवडक

## खारघरमध्ये प्रभात फेरी

**पनवेल :** पनवेल विधानसभा मतदारसंघ मध्ये मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता जनजागृती करण्यासाठी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार व स्वीप कार्यक्रम प्रमुख शहर अभियंता संजय कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली खारघरमध्ये प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभात फेरीमध्ये सहाय्यक आयुकत स्मिता काळे, प्रभारी अधिक्षक जितेंद्र मढवी, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## शेडुंग चेकनाका येथे तपासणी

**पनवेल :** निवडणूक विभाग अंतर्गत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिर सर्वेक्षण पथक क्रमांक ६ ने पनवेलजवळील शेडुंग टोल नाका येथे वाहन तपासण्याचे कर्तव्य करत असताना रात्रौ २३:५५ वाजण्याचे जुन्या मुंबई-पुणे हायवे रोडवरुन जाणाऱ्या हुंडाई ऑरा पांढऱ्या रंगाची चार चाकी गाडी थांबवून तपासणी केली असता त्या गाडीमध्ये ४ लाख ३१ हजाराची रोख रक्कम आढळून आली. सदरील रक्कम संशयास्पद असल्याने ही रक्कम पथकामार्फत जप्त करण्यात आली.

## दिवाळी फराळ वाटप

**उरण :** कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी विविध उपक्रम राबवले जातात. सामाजिक बांधिलकी जपत कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान सिबर्ड विशेष मुलांची शाळा बोरी नाका उरण मोरा रोड येथे दिवाळीनिमित्त मुलांना फराळ वाटप तसेच चित्रकलेचे साहित्य वाटप करण्यात आले. त्यानंतर रायगड जिल्हा परिषद शाळा पागोटे, कुंडेगाव, नवघर या शाळेतील सर्व मुलांना दिवाळीच्या फराळाचे वाटप करण्यात आले.

## दोन अपघातात तीन ठार

**पनवेल :** पनवेल परिसरात झालेल्या २ वेगवेगळ्या अपघातात ३ ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. पनवेलजवळील अजिवली स्टॉप येथील अनिलकुमार ठाकूर याच्या स्कुटीस टँकरने धडक मारुन झालेल्या अपघातात त्याचा मृत्यू झाला आहे. दुसऱ्या घटनेत पळस्पे ते जेएनपीटीकडे जाणाऱ्या टी पॉईंट जंक्शनच्या सर्व्हीस रोडवर ब्रीजच्या जवळ एका डंपरची हिरो एक्स्ट्रीम दुचाकीला धडक बसल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार प्रथम म्हात्रे (२३) व साक्षी जाधव (२४) यांचा मृत्यू झाला आहे.

## पुरवठा शाखेत गर्दी

**पनवेल :** पनवेलच्या पुरवठा शाखेत रेशनिंग कार्ड व इतर कामांसाठी नागरिकांची गर्दी होत आहे. मात्र महिना उलटून गेला तरीदेखील रेशन कार्ड मिळत नसल्याने नागरिक नाराज आहेत. एक ते दीड महिन्यांपूर्वी पुरवठा विभागाचे अधिकारी प्रदिप कांबळे यांची बदली झाल्यानंतर अश्विनी धनवे यांची हा ठिकाणी नियुक्ती करण्यात आली. त्यांची काम करण्याची पद्धत वेगळी असल्याने त्याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. नवीन रेशनिंग कार्ड बनवण्यासाठी ढीग लागलेला दिसून येत आहे.

# तापमानवाढीचा परिणाम मासळीवर



**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

ऑक्टोबर हिटमुळे कासावीस झालेल्या मुरूडकरांच्या समस्येवर अद्याप कोणताही दिलासा मिळेल असे सध्या तरी वाटत नाही. नवरात्रीपासून मुरूड तालुक्यातील वाढलेले तापमान रविवारी दुपारीदेखील ३१ सेल्सिअसवर कायम आहे. राज्यातील प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख आणि महाराष्ट्र हवामान विभाग यांनी रविवारी दिलेल्या हवामान अंदाजानुसार ओरिसा, बंगालमध्ये आलेल्या 'दाना' चक्रीवादळाचा परिणाम महाराष्ट्रातदेखील होण्याची दाट शक्यता असून दिवाळीत ३१ ऑक्टोबरपर्यंत कधीही पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.

मुरूड तालुका समुद्रकिनारपट्टीतील एकदरा, नांदगाव, बोर्ली, राजपुरी, मुरूड, खामदे या समुद्रात वाढलेल्या तापमानाचा मासळीवर परिणाम झाला असून फक्त कोलंबी मासळी बऱ्यापैकी मिळत असल्याची माहिती नाखवा रोहन निशानदार यांनी दिली.

**वातावरण बदलाचा थेट परिणाम माशांच्या अधिवासावर दिसू लागला आहे. मोठ्या प्रमाणात मिळणारे जेलीफिश, ट्रीगर फिश आणि पेडव्या, बांगड्यासारख्या माशांचा झालेला प्रवास याचेच संकेत देत आहेत.**

**पावसाचे वेळापत्रकही कोलमडले आहे. बऱ्याचदा वातावरणातील याच बदलामुळे मत्स्य हंगामातील दिवस कमी होतात. बदलत्या करंटस्‌चा परिणाम मच्छिमारांच्या थेट अर्थकारणावर परिणाम करत आहेत.**

नवरात्रीपासून मासळी मिळत नसल्याने मासेमारी नौका किनाऱ्यावर आणण्यात आल्या आहेत. जादा फायदा मिळणारी पापलेट, रावस, सुरमई, बांगडासारखी मोठी मासळी जवळपास मिळत नसल्याने नौका मालक आणि मच्छिमार आर्थिक संकटात सापडले आहेत.कधी कधी मासेमारीस गेलेल्या मच्छिमारांचे डिझेलचे पैसेदेखील सुटत नाही, असे नौका मालक रोहन निशानदार यांनी सांगितले. बदलते हवामान, वादळी वारे आणि पर राज्यातील वादळाचादेखील परिणाम होत आहे. यामुळे मासळी सैरभैर होत असून अनेकवेळा स्थलांतर करीत असल्याने समुद्रात हमखास मासळी मिळण्याची ठिकाणे बदलत आहेत. तापमान वाढ कायम असल्याने समुद्राचे पाणी गरम होते. उथळ समुद्रात पाणी अधिक गरम राहत असल्याने मासळी खोल समुद्रातील थंड पाण्याचा आसरा घेत असते अशी माहिती एकदरा गावचे मच्छिमार रोहन निशानदार यांनी दिली.

समुद्रात पाणी अधिक गरम झाल्यास ऑक्सिजन निर्मितीला बाधा येते. माशांना श्वास घेण्यास मोठा त्रास होऊन गुदमरल्यासारखे होते. चयापचय क्रिया बिघडते. जीवाच्या आकांताने मासळी अशा प्रसंगात खोल थंड पाण्यात स्थलांतर करीत असते. त्यामुळे परंपरागत मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना मासळी मिळत नाही. तालुक्यात सकाळी तापमान २५ ते २६ सेल्सिअस असून हिवाळ्याची चाहूल लागली असली तरी दुपारी कडक ऊन पडत असून तापमान ३१ ते ३२ सेल्सिअसपर्यंत जात कपाळावरून घामाच्या धारा वाहताना दिसून येत आहेत.

# रेल्वे कामगार संघटनेची मान्यता
## नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी शक्तीप्रदर्शन



**। मुंबई । वार्ताहर ।**

भारतात रेल्वे कामगारांची संख्या जवळजवळ अकरा लाख असून, मध्य रेल्वेच्या कामगारांची संख्या जवळपास एक लाख आहे. या उद्योगात कामगार कायद्यानुसार युनियन मान्यतेसाठी गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक केली जाते. या उद्योगात नॅशनल रेल्वे मजदूर युनियनला पुन्हा मान्यता मिळविण्यासाठी ४ ते ६ डिसेंबर २०२४ दरम्यान निवडणूक होणार असून या निवडणुकीचे नामांकन अर्ज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथील महाप्रबंधक कार्यालयात कामगारांच्या उपस्थित भरण्यात आले. याप्रसंगी नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे पदाधिकारी व सक्रिय कार्यकर्त्यांनी सीएसटी येथे मोर्चा नेऊन आपले शक्तिप्रदर्शन केले.

बैठक सुरू होण्यापूर्वी प्लॅटफॉर्म क्रमांक ७ आणि ८ पासून कार्यालय मार्गे उपनगरीय लॉबीपर्यंत कामगार मोर्चाने गेले, त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे महामंत्री कॉ. शिवगोपाल मिश्राजी आणि नॅशनल रेल्वे मजदूर युनियन व कोकण रेल्वेचे महामंत्री कॉ. वेणू पी. नायरजी यांनी पुष्पहार अर्पण केला.

त्यानंतर जनरल मॅनेजर ऑफिस कंपाऊंड क्षेत्राकडे मोर्चा पुढे जाऊन मिटिंग सुरू झाली. नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे महामंत्री कॉ. वेणू नायरजी यांनी आपल्या तेजस्वी भाषणातून चांगला संदेश देऊन रेल्वे कामगारांचा उत्साह वाढविला. ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे महामंत्री कॉ. शिवगोपाल मिश्राजी यांनी सरकारची सद्यस्थिती, युनियनची गरज आणि पेन्शन योजनेच्या गोंधळाबद्दल बोलून इंटक प्रणित संघटना कामगारांच्या पाठीत खंजीर खुपसते. १९६०,१९७४ चा संप फोडून सरकारची लॉयल्टी व आपल्या मुलांना रेल्वेत नोकरीत सामावून घेतले.

राहिलेले मुद्दे सुद्धा चर्चेद्वारे सोडविले जातील याची हमी यावेळी त्यांनी कामगारांना दिली व ज्या कर्मचाऱ्यांना आपल्या निवडीनुसार किंवा घेण्यासाठी ऑप्शन देण्यात आले आहेत. त्यांनी ऑप्शन देताना विचारपूर्वक निवड करावी हे सुद्धा सांगितले आहे.

रेल्वे मुख्यालय व विभागातील सर्व पदाधिकारी, युवा, महिला कॉम्रेड, पदाधिकारी आणि विभागातील सर्व सक्रिय सदस्यांनी या मिटिंगमध्ये सहभाग घेतल्यामुळे मिटींगला हजारोच्या संख्येने उपस्थिती होती. याप्रसंगी ऑल इंडिया रेल्वेमेन्स फेडरेशनचे झोनल सचिव कॉ. पी. जे. शिंदे, कॉ. विवेक नायर, कॉ. पी. टी. एस. राजा, कॉ. श्याम नायक, कॉ. बी.एल. यादव, कॉ. विनय सावंत कॉ. संतोष कुमार, कॉ. आर. के. मलबारी, सर्व मंडळाचे अध्यक्ष, मंडळ सचिव, युवा महिला, शाखा पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# तळोजामध्ये तीन बांगलादेशी जेरबंद

- **दहशतवाद विरोधी पथकाची कारवाई**
- **तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**। पनवेल । वार्ताहर ।**

दहशतवाद विरोधी पथक नवी मुंबई युनिटने तळोजा, सेक्टर-२३ मधील द्विशा हाईटस् या इमारतीवर छापा मारुन मागील २० ते २५ वर्षापासून बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या २ महिला आणि १ पुरुष अशा ३ बांग्लादेशी नागरिकांना अटक केली आहे. या बांगलादेशी नागरिकांनी भारतील ओळखीचा पुरावा असलेले आधारकार्ड आणि पॅनकार्ड बनवून घेतल्याचे उघडकीस आले आहे.

तळोजा, सेक्टर-२३ मधील द्विशा हाईटस् इमारतीतील दोन संशयित घरावर छापा मारला. यावेळी एका घरामध्ये शोझीब बोलू शेख आणि अमिना उर्फ राणी शोझीब असे पती-पत्नी तर दुसऱ्या घरामध्ये रोवून नेकबोरे झामन मुल्ला आणि रेश्मा रोवुन झामन मुल्ला असे पती-पत्नी राहत असल्याचे आढळून आले. त्यामुळे दहशतवाद विरोधी पथकाने या चौघांना ताब्यात घेतले. त्यानंतर दहशतवाद विरोधी पथकामधील अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे कागदपत्रांची चौकशी केली असता, त्यांच्याकडे भारतातील ओळखपत्र आधारकार्ड आणि पॅनकार्ड आढळून आले.

पोलिसांनी त्यांच्याजवळ असलेले आधारकार्ड आणि पॅनकार्ड जप्त केले. यावेळी पोलिसांनी सदर बांगलादेशी नागरिकांच्या मोबाईल फोनची तपासणी केली असता त्यांच्या मोबाईल फोनमध्ये बांगलादेशी कॉलींग कन्ट्री कोडने सुरु होणारे अनेक संपर्क नंबर आढळून आले. तसेच त्यांच्या मोबाईलमध्ये इमो नावाचे ॲप्लेकेशन्स सुध्दा आढळून आले असून त्याद्वारे त्यांनी बांगलादेशात व्हिडीओ कॉल झाल्याचे आढळून आले. त्यानंतर दहशतवाद विरोधी पथकाने केलेल्या चौकशीत चौघांनी २० ते २५ वर्षापूर्वी घुसखोरीच्या मार्गाने भारत-बांगलादेश सीमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवून आणि स्थानिक मुलकी अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय तसेच कोणत्याही वैध प्रवासी कागपत्रांशिवाय भारतात प्रवेश केल्याचे कबूल केले. तेव्हापासून ते भारतात राहत असल्याचे आढळून आले. त्यामुळे दहशतवाद विरोधी पथकाने २ महिला आणि १ पुरुष या तिघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात पारपत्र आणि विदेशी व्यक्ती अधिनियमानुसार गुन्हा दाखल करुन तिघांना अटक केली आहे. दरम्यान, सदर कारवाईत ताब्यात घेण्यात आलेला चौथा बांगलादेशी नागरिक रोवुन नेकबोरे मुल्ला याच्या विरोधात २०२० मध्ये मुंबईतील सहार विमानतळ पोलीस ठाण्यात पारपत्र कायदा, परदेशी नागरिक कायदा तसेच फसवणूक आणि बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असल्याचे त्याच्या चौकशीत आढळून आले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ असल्याने या गुह्यात आरोपी रोवुन मुल्ला याची जामिनावर सुटका करण्यात आली आहे. त्याला सोडून देण्यात आले.

# कंदील व्यवसायावर मंदीचे सावट



**। रायगड । प्रतिनिधी ।**

**दरवर्षी राजकीय पक्षांकडून साधारण मोठ्या कंदिलांची मागणी असते; मात्र यंदा आचारसंहितेमुळे राजकीय पक्षांकडून मोठ्या कंदिलांसाठी मागणी नाही. विधानसभा निवडणुकीसाठीच्या आचारसंहितेमुळे आकाश कंदिलांची निर्मिती कमी झाली असून व्यवसायावर आर्थिकदृष्ट्या परिणाम झाला आहे.**
**– चंद्रकांत बामणे, विक्रेते**

दिवाळीत घरोघरी आकाश कंदील लावले जातात. त्याचप्रमाणे दिवाळीच्या वेळी शहरांच्या चौकात, गल्लीत आपल्या राजकीय पक्षांचा प्रचारासाठीदेखील या कंदिलांचा वापर केला जातो. दिवाळीच्या काळात दोन ते तीन महिन्यांपासून कंदील बनवणाऱ्या कारागिरांना मोठमोठ्या कंदिलांची ऑर्डर दिली जाते; मात्र सध्या निवडणुकीच्या काळात महाराष्ट्रात आचारसंहिता लागू झाल्याने राजकीय पक्षांच्या प्रचाराला काही मर्यादा आल्या आहेत.

त्यामुळे आपल्या नेत्याचा फोटो, दिवाळीच्या शुभेच्छा, पक्षांचे चिन्ह वगैरे वापरण्यास निवडणूक आयोगाकडून काही बंधने आली आहेत. त्यामुळे यंदाच्या दिवाळीत राजकीय कंदिलांच्या ऑर्डर न मिळाल्याने कंदील तयार करणारे कारागीर आणि व्यावसायिकांना ऐन दिवाळीच्या काळात आर्थिक तंगी अनुभवावी लागत आहे.

दिवाळीच्या काळात कंदील व्यवसायाला बहर येतो. हंगामी व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिक, कारागिरांसाठी दिवाळी सण हा कमाईचा मोठा स्रोत असतो. घरगुती कंदिलातून मिळणारा नफा कमी असतो.

त्याउलट राजकीय किंवा मंडळांसाठी बनवलेल्या कंदिलांची किंमत जास्त आणि त्यातून मिळणारा नफादेखील जास्त असतो. त्यामुळे लहान कंदिलांसोबतच मोठ्या कंदिलांनादेखील व्यावसायिकांकडून विशेष प्राधान्य दिले जाते; मात्र आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून कंदिलांचा ऑर्डर येणे बंद झाल्याचे कंदील व्यावसायिक सांगत आहेत.

त्यामुळे दरवर्षी होणाऱ्या आर्थिक उलाढालीवर काहीसा चाप बसल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. याचाच दुसरा परिणाम म्हणजे कारागिरांचे रोजगारदेखील यंदा कमी झाल्याचे व्यावसायिक सांगत आहेत.

निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांची आणि सर्वसामान्य नागरिकांची दिवाळी जरी धुमधडाक्यात साजरी होणार असली तरी कंदील व्यवसायावर मंदीचे सावट पसरलेले पाहायला मिळत आहे. वाढत्या महागाईचा परिणाम कंदील बनवण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालावरदेखील झाला आहे. त्यामुळे कंदिलांच्या किमती काहीशा वाढल्या आहेत; मात्र दिवाळीच्या सणात कंदील विकत घेण्यासाठीचा नागरिकांचा उत्साह कमी झालेला नाही.

## नवतरुण भजनी मंडळाला मिळाली
# पंढरपूरच्या मंदिरात भजनाची संधी

**। रसायनी । वार्ताहर ।**

नवीन पोसरी मोहोपाडा येथील गुरुवर्य ह.भ.प. काशिनाथ महाराज लबडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तसेच मोहोपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते वसंतशेठ पाटील यांच्या सहकार्याने दोन दिवस नवतरुण भजन मंडळ नविन पोसरीने आयोजित केलेल्या पंढरपूर येथील यात्रा उत्सव मोठ्या भक्तीमय उत्साही व आनंदमय वातावरणात पार पडला.



येथील नवतरुण भजन मंडळाला पंढरपुरच्या विठुरखुमाई मंदिरात भजन करण्याचे भाग्य मिळाल्याने वारकरी सांप्रदायसह नवीन पोसरी मोहोपाडा येथील नवतरुण मित्रमंडळाचे पदाधिकाऱ्यांमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. नवीन पोसरी येथील तरुणांत भजनाची आवड निर्माण झाली असून येथील नवतरुणांईही हरिनामाच्या जयघोषात तल्लीन झाल्याचे दिसून येते.यातच हरिनामाची ओढ लागलेल्या तरुणांना पंढरपूरला भजनाची संधी मिळाल्याने समाधान झाले. अशाचप्रकारे मोहोपाडा परिसरातही नवतरुणांत भजनाची आवड निर्माण व्हावी यासाठी ज्येष्ठांकडून परिसरात भजनी नवतरुणांना प्रशिक्षण देवून तयार केले जात आहेत.

# समन्वयातून महसूल, पोलिसांचे कामकाज



- **कर्मचाऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध असल्याची अधिकाऱ्यांची माहिती**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदार संघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महसूल व पोलीस प्रशासन कामाला लागले आहे. ही प्रक्रीया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी ही यंत्रणा समनव्य साधत रात्रीचा दिवस करून काम करीत आहेत. कर्तव्य बजावत असताना सुविधांपासून कर्मचारी वंचित राहू नये याची दखलही पोलीस व महसूल प्रशासनाकडून घेण्यात आली आहे.

अलिबाग, पनवेल, पेण, कर्जत, महाड, श्रीवर्धन, उरण या सात विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान व २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. अलिबागसह अन्य उपविभागीय अधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. दहाहून अधिक उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २९ ऑक्टोबर आहे. आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी अलिबागसह अन्य उपविभागीय कार्यालय व परिसरात महसूल व पोलीस प्रशासन यंत्रणा कामाला लागली आहे.

पोलीस व महसूल विभाग समन्वय साधून काम करीत असल्याचे चित्र आहे. अर्ज भरण्याच्या कार्यालयापासून कार्यालयाच्या बाहेर पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला आहे. सध्या ऑक्टोबर हीटचे चटके जाणवत आहेत. उन्हात उभे राहून कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलण्यात आली आहेत. त्यांना लागणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी विनित चौधरी व अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी दिली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A. प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाऊस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३
- अलिबाग एस टी स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे ९७६४५४८६७९
- आयुर्विमा ऑफीस कामासाठी महिला पाहिजे पत्ता विजयनगर-वरसोली, वरसोली नाक्याजवळ मो.९४२२४९४५९०/७५०७९२९१२८
- सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किंमतीतील घर पोयनाड अलिबाग येथे उपलब्ध Collector /Bank Approved Project 1RK & 1BHK. Starting price 12.25 Lac Onwards. Diwali Offer. Booking 50,000 /- only Call + 7700999220/ 9022272212.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## पर्यटन व्यावसायिक तूर्तास सुखावले
# काशीद बीचवर पर्यटकांनी लावली हजेरी

- **दिवाळीच्या सुट्टीत पर्यटक वाढणार**
- **शासनाकडून सुविधांची आवश्यकता**

प्रकाश सद्रे
**। मुरूड जंजिरा ।**

खूप दिवसांच्या प्रतीक्षेनंतर शनिवार (दि.) पासून मुरूड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद बीचवर पर्यटकांनी हजेरी लावली आहे. पर्यटकांच्या हजेरीने किनाऱ्याला उर्जितावस्था आली आहे, अशी माहिती काशीद येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जंगम यांनी बोलताना दिली.



मात्र खूप मोठ्या प्रमाणांत पर्यटक नसले तरी ८० ते १०० वाहने दिसून येत आहेत.

पर्यटकांमुळे काशीदबीच फुल नसला तरी आलेल्या पर्यटकांच्या हजेरीने व्यवसायिक तूर्तास सुखावले असल्याचे सांगण्यात आले. आल्या आल्या पर्यटकांनी समुद्रकिनारी धाव घेऊन आनंद व्यक्त केल्याचे दिसून आले.

मधल्या काळात बिचवरील पर्यटन खूपच रोडावले होते.मोजकेच पर्यटक डोकावून जात असल्याने पर्यटन व्यवसाय थंडावला होता. काशीद बीच हे ठिकाण म्हणजे मुरूड तालुक्यातील काशीद बीच पर्यटकांतून कमालीचे लोकप्रिय ठिकाण असून संपूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे.

नवरात्रीपर्यंत बीचवर अधिकतर शुकशुकाट जाणवत होता. पर्यटक आल्याने पर्यटन व्यवसायिकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

पर्यटक सुट्टीच्या दिवशी किंवा शनिवारी येतात आणि रविवारी घरी परत जातात. मुरूड तालुक्यातील पर्यटन स्थळांवर पर्यटक आठवडाभर स्थिरावले तरच येथील पर्यटन व्यवसायाची भरभराट होऊ शकेल. यासाठी शासनाकडून उत्तम उपाययोजना निर्माण झाल्यास नावलौकिक अधिक वाढेल. दिवाळीच्या सुट्टीत पर्यटक मोठ्या संख्येने येतील अशी प्रतिक्रिया सूर्यकांत जंगम यांनी दिली.

# रायगड टॅलेंट सर्च परीक्षा

। माणगाव । प्रतिनिधी ।

जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी रायगड टॅलेंट सर्च परीक्षा सुरू करण्यात आलेली आहे. यावेळी रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातून ३ हजार ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील विविध केंद्रांवर शनिवार (दि.२५) आरटीएसचा पेपर क्र. ३ घेण्यात आला. माणगाव तालुक्याचे गटविकास अधिकारी संदीप जठार आणि गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या मार्गदर्शनाखाली तळाशेत, माणगाव आणि गोरेगाव या ३ परीक्षा केंद्रावर १३९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी सहभाग नोंदविला होता.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी व्हावी व मुलांना शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेत घवघवीत यश मिळविण्यासाठी आरटीएस ही नवीन संकल्पना राबविली जात आहे. नवजीवन हायस्कूल तळाशेत, अशोकदादा साबळे हायस्कूल माणगाव आणि गोरेगाव मुलगे या शाळांनी सदर परीक्षेसाठी वर्गखोल्या उपलब्ध करून दिल्या. यासाठी आरटीएसचे संस्थापक रत्नाकर पाटील, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, केंद्रप्रमुख कुमार खामकर, गणेश ढेपे, सर्व जिल्हा व तालुका केंद्र कमिटी यांचे खूप मोलाचे योगदान लाभले.

या परीक्षेसाठी जिल्हा परिषदेचे शिक्षक अरविंद मोरे, मंगेश म्हस्के, अमोल गुरव, अशोक माळवे, सुधा मोरे, आनंद गायकवाड, महादेव बांगर, भावना कुसुमकर, संजय गावडे, वैभव सूर्यवंशी, प्रकाश खडस, विशाखा डांगे, नेहा जाधव, मंगला भोसले, रुचिता मेहता, माने यांनी केंद्र संचालक व पर्यवेक्षक म्हणून प्रत्येक केंद्रावर उत्तमरीत्या काम करून तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी खूप मोलाचे योगदान दिले आहे. यावेळी मुकेश भोस्तेकर यांनी तालुका प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली.



## परीक्षेचा केंद्रनिहाय निकाल

तळाशेतः– आयुष निकम १८६, स्वरुप बडेकर १४६, ओवी शिंदे १४४, श्रावण गव्हाणे १४२, आर्या कजबजे १३४.
माणगावः– सार्थक जाधव २३४, स्वरा खानविलकर २०८, प्रथमेश जाधव २०२, क्षितिज आरसे २०२, अवनी कदम १८०.
गोरेगावः– अक्षरा सुर्यवंशी २८०, श्रीश शिंदे २५०, आदित्य निंबाळकर २३४, निहान गावडे १९२, काव्या गायकवाड १८६.

# सुक्या मेव्याला वाढती मागणी

। पनवेल । वार्ताहर ।

दिवाळी सणात आप्तस्वकीय तसेच मित्र परिवार, स्नेही यांना भेट वस्तूंसह मिठाई भेट देण्याची परंपरा आहे. मात्र, मिठाई अल्पावधीतच खराब होत असल्याने आता मिठाईच्या जागी सुका मेवा भेट देण्याची पद्धत वृध्दींगत होत चालली आहे. यामुळे दिवाळीच्या तोंडावर सुक्या मेव्याची मागणी वाढत आहे. दिवाळीत घरोघरी तयार केल्या जाणाऱ्या तसेच रेडीमेड फराळामध्ये व मिठाईमध्ये प्रामुख्याने काजू, बदाम, पिस्ता, आक्रोड, अंजीर, किसमिस आणि खारीक यांचा प्रामुख्याने वापर केला जातो. अनेक जण हा सुकामेवा आपल्या आप्तेष्टांना तर कंपन्या आपल्या कर्मचारी वर्गाला भेट म्हणून देतात. यामुळे दिवाळीच्या अनुषंगाने सुका मेव्याला मागणी वाढली आहे. मात्र, यंदा काजूच्या दरात वाढ झाली असून इतर सुका मेवा स्थिर आहे,.

# राजिप शाळेचा स्तुत्य उपक्रम




। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

वडगाव रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असते. यावर्षी दिवाळी सणाच्या उत्सवात विधानसभेच्या निवडणूकीचे पडघम वाजत आहेत. मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहिर केली जाते, तरी काही नागरिक मतदान करीत नाहीत. म्हणूनच स्विप कार्यक्रमांतर्गत 'अभिनव मतदान जनजागृती' करण्यासाठी राजिप शाळा वडगावने लोकशाहीत मतदानाला खूप महत्व असल्याचे पटवून देण्यासाठी एक कंदील, एक दिवा, तसेच 'मतदान कर रे भावा' असा संदेश देत एक हजार शुभेच्छा कार्डचे वाटप करत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी गावामध्ये जाऊन शुभेच्छा कार्ड सोबतच लोकशाही व जागर मतदानाचा हा कार्यक्रम हाती घेतला होता. तसेच, 'चला करू मतदान' या गीतावर नृत्य, पथनाट्य व जनजागृतीचा संदेश देणारे आकाश कंदील, रांगोळ्या, 'मतदान करा' असा संदेश देणारे भेटकार्ड गावातील प्रत्येक व्यक्तीला देऊन जनजागृती करण्यात आली.

> विद्यार्थ्यांनी आगामी विधानसभा निवडणूकीला जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी दिवाळी सणाचे औचित्य साधून मतदान जनजागृतीसाठी केलेला हा उपक्रम खरोखर स्तुत्य आहे.
> –महादेव गडगे,
> मा. सरपंच, वडगाव

> वडगाव शाळा, सुभाष राठोड व सर्व शिक्षक नेहमीच वेगवेगळे यशस्वी उपक्रम राबवत असतात. यावेळी केलेल्या १ हजार शुभेच्छा कार्डाच्या माध्यमातून मतदान जनजागृती ही अभिनव संकल्पना सुंदर व कौतुकास्पद आहे.
> – कैलास चोरमले,
> गटशिक्षणाधिकारी खालापूर

# पेव्हर ब्लॉक लावण्यास सुरुवात

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमध्ये मलनिसारन प्रकल्प हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जात असून मुख्य रस्त्यावर खोदकाम करून पाईप जोडण्या केलेल्या आहेत. हे खोदकाम करताना मुख्य रस्त्यावरील ब्लॉक्स काढण्यात आले होते. यामुळे मातीच्या धुळीपासून पर्यटकांना तसेच व्यापारी वर्गाला मोठ्या प्रमाणवर त्रास होत आहे. व्यापारी वर्गाच्या मालाचे नुकसान होऊ नये तसेच पर्यठकांना मातीचा त्रास होऊ नये यासाठी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी एसटीपी ठेकेदारांना ब्लॉकपूर्ववत लावण्याच्या सूचना केल्या होत्या. याची दखल घेत एसटीपीच्या क्ले पेव्हर ब्लॉक लावण्याच्या कामाने गती घेतली आहे.



धूळ विरहित रस्त्यांना एकमेव पर्याय म्हणून सनियंत्रण समितीच्या परवानगीने क्ले पेव्हर ब्लॉक लावण्यात आले आहेत. यामुळेच धुळीचे प्रमाण खूपच कमी झालेले आहे. पावसाळ्यात मातीची धूप याच माध्यमातून थांबली असल्यामुळे या रस्त्यावरून चालताना एक वेगळाच आनंद पर्यटकांना तसेच स्थानिकांना मिळत आहे. सध्यातरी ही कामे युद्धपातळीवर सुरू असून कामात काही त्रुटी निदर्शनास आल्यास येथील स्वयंघोषित इंजिनियर सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त करत आहेत. यामुळे कामे सुस्थितीत होण्यास ठेकेदाराला मदत होत आहे. जवळपास पन्नास कोटी रुपयांची ही कामे चांगल्या पद्धतीने पूर्ण व्हावीत यासाठी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी स्वतः जातीने लक्ष देत आहेत.

# दिवाळीनिमित्त बाजारपेठा गजबजल्या

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।



पाली हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक दिवाळीतील खरेदी करण्यासाठी मोठ्या संख्येने येथे येत असतात. यावेळी पाली बाजारपेठ दिवाळी निमित्त सुशोभित आकाश कंदील, पणत्या, रांगोळी, फटाके यांनी बहरून गेली आहे. पालीतील श्री छत्रपती संभाजी महाराज चौकात या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आली आहे. तसेच, दिवाळीमध्ये शाळकरी मुले मातीपासून किल्ले तयार करत असतात. किल्ले आकर्षक व शोभिवंत करण्यासाठी लागणारे मातीचे सैनिक, मावळे, पणत्या व इतर साहित्य पालीतील कुंभार आळीतील कलाकारांनी तयार करून वक्रीसाठी ठेवल्या आहेत. रविवारी सुट्टी असल्याने बच्चेकंपनीने मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती.

# निधी फाऊंडेशनतर्फे स्वच्छता मोहिम



। अलिबाग । वार्ताहर ।

निधी फाऊंडेशन झालखंड हे शैक्षणिक कार्य व पर्यावरण जतनकरण्यासाठी कार्य करीत आहे. तसेच, निधी फाऊंडेशन विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्याकरिता त्यांच्याकरिता मार्गदर्शक शिबीर आयोजित करीत आहे. यावेळी फाऊंडेशन तर्फे रविवारी (दि.२७) किहिम समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहीमेमध्ये अनिल सिताराम काठे यांनीही सहभाग घेतला होता. या कार्यक्रमासाठी किहीम सरपंच व सर्व सभासद तसेच निधी फाऊंडेशनचे गणेश थळे, चेतन लखीमले, अनिल काठे, निनाद काठे व इतर सदस्य तसेच झालखंड व किहिम गावातील नागरीकांनी सहभाग घेतला होता.

# माणगाव डीएलएलई प्रशिक्षण शिबीर



। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव येथील टीएमसी महाविद्यालयात शनिवारी (दि.२६) जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटी संचालित माणगावातील टिकामभाई मीठ वाणिज्य महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभाग मार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम सत्र प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी. डॉ. पांडे यांनी विध्यार्थ्यांना डीएलएलई विभाग व या अंतर्गत वर्षभरात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांविषयी थोडक्यात माहिती दिली. प्राचार्य जोशी यांनी महाविद्यालयात विविध महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये भाग घेण्याकरता विध्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले. तसेच, महाविद्यालयाचे ग्रंथपाल व अमित बाकाडे यांनी विध्यार्थ्यांना डीएलएलई विस्तार प्रकल्पांविषयी व मुंबई विद्यापीठांतर्गत दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या 'उड्डाण' महोत्सवाबाबत माहिती दिली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मंबई विद्यापीठ रायगड विभागाचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. जयशंकर पांडे उस्थितीत होते. याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य हर्षल जोशी, डॉ. जगदीश शिगवण व अमित बाकाडे उपस्थितीत होते. कार्यक्रमाअंती प्रमुख पाहुणे, महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यक्रम सहाय्यक दिलीप चव्हाण, रमेश पाटील व सर्व उपस्थीत विद्यार्थ्यांचे आभार मानून कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे **सालवड,** ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. दिपक अनंत म्हात्रे २) श्री. मयुर अनंत म्हात्रे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४७ | ३ | ०-२१-०० | ०=१९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/१०/२०२४ **ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४, ९२७१८६९२०२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

**पेण येथील मे. तहसीलदार तथा न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात**

श्री. लियाकत अली हुसेनमिया मुजावर — अर्जदार
रा. खान मोहल्ला, पेण ता. पेण जि. रायगड
विरुद्ध
पेण नगरपरिषद पेण — सामनेवाला

सर्व तमाम जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा बहिणीचा मृत्यू खान मोहल्ला, पेण ता. पेण, जि.रायगड येथे दि. १९-०९-२०१३ रोजी झालेला असल्याने त्यांच्या मृत्यु तारखेची नोंद पेण नगरपरिषद पेण यांचे कार्यालयांतील मृत्यू नोंद रजिस्टरला नोंद करणेबाबत सदरचा अर्ज कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे मुदतीत आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह मे कोर्टात दाखल काराव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचा अर्ज मागणी प्रमाणे मंजूर करण्याचे आदेश पारित करण्यात येतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि. १५-१०-२०२४ रोजीचे सहीने दिली.

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पेण

## जाहीर नोटीस

दिनांक : २८ ऑक्टोबर २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलानी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**


**मौजे - अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| सदाशिव जैतु डायरे | १०९ | २ | ०-७४-०० | ० | ३३ |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, **ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर, दिनांक :- २८/१०/२०२४
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ मो. नं. ९१५८२७७७२८

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या–कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड गट नं. १६०१/१, एकुण क्षेत्र ०-०४-३० हे.आर., आकार ०.३१ रु.पै. ही मिळकत तसेच सदरहु मिळकतीतील ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्र. ३१२३ ही घर मिळकत, या जमीन व घर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुहास दत्ताराम पवार व सौ. स्नेहा सुहास पवार दोघेही रा. बी १०४, अरेना नक्षत्र, को. ऑप. हौ. सो. सेक्टर ४, विवियाना मॉल, लक्ष्मी नगर, ठाणे पश्चिम यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीखः २७/१०/२०२४ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
**पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,**
**रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,**
**अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.**

## PUBLIC NOTICE

**NOTICE** is hereby given to the public at large that we are investigating title on behalf of Mr. Vinod Shenoy **("Owner")** in respect of his undivided share in the properties more particularly described in the Schedule hereunder written **("Properties").**

All or any person having any right, title, interest, claim, demand and/or objections against/upon/in respect of/to the said Properties by way of sale, exchange, lease, tenancy, license, trust, lien, maintenance, easement, inheritance, possession, attachment, mortgage, charge, gift, lis-pendens, FSI consumption, development rights or otherwise of any nature whatsoever and in howsoever manner is hereby requested to give written notice of the same to **Zunjarrao & Co., Advocates & Solicitors, having their address at 4th Floor, Jalaram Jyot, Janmabhoomi Marg, Fort, Mumbai - 400 001,** along with certified true copies of documents in support of such right, title, interest, claim, demand and/or objections within **14 (Fourteen) days** from the date of publication of this Notice, failing which it shall be presumed that no such claim, demand or objection exists and even if such claim, demand or objection exists in law or otherwise, it shall be deemed that the claimant has relinquished such claim, demand or objection and/or waived any right to exercise such claim, demand or objection.

**THE SCHEDULE**
**(said "Properties")**

1. Undivided interest in the following parcels of lands situated at Village – Kamath (old Kihim), Taluka – Alibag, District – Raigad within the local limits of Panchayat Samiti, Alibag and the Zilla Parishad of Raigad in the Registration District and Sub-District of Raigad:

| Sr. No. | Gat No. | Area (H.A.Sq.M.) | Boundaries |
|---|---|---|---|
| 1. | Gat No. 278 | 0.42.60 | On or towards North : Gat No. 490<br>On or towards South : Gat No. 482 (pt), 472, 279<br>On or towards East : Gat No. 269 and 267<br>On or towards West : Gat No. 483 and 482 (pt) |
| 2. | Gat No. 467 (old Gat No. 1029) & a House No. 105 thereon | 0.26.70 | On or towards North : Gat No. 466<br>On or towards South : Gat No. 468<br>On or towards East : Road<br>On or towards West : Gat No. 469 |
| 3. | Gat No. 481 (old Gat No. 1043) | 0.05.80 | On or towards North : Gat No. 482<br>On or towards South : Gat No. 472<br>On or towards East : Gat No. 472<br>On or towards West : Gat No. 472 |
| 4. | Gat No. 489 (old Gat No. 1051) and House No. 75 and 76 thereon | 1.00.00 | On or towards North : Gat No. 490<br>On or towards South : Gat No. 884 & 885<br>On or towards East : Gat No. 510<br>On or towards West : Gat No. 886 |
| 5. | Gat No. 116/1 and House No. 245 | 04.06.60 | On or towards North : Gat No. 115, 117 & 121<br>On or towards South : Gat No. 120<br>On or towards East : Gat No. 112, 119,122, 133, 84, 85 & 87<br>On or towards West : Gat No. 94A, 93, 92, 91 & 89 |
| 6. | Gat No. 490 (old Gat No. 1052) and House No. 77 and House No. 266 named "Advance" | 0.83.00 | On or towards North : Gat No. 491 & 492<br>On or towards South : Gat No. 484, 488, 483/B & 278<br>On or towards East : Gat No.481, 482, 277 & 269<br>On or towards West : Gat No. 486 & 487 |
| 7. | Gat No. 495 (old Gat No. 1057) | 0.08.60 | On or towards North : Gat No. 42<br>On or towards South : Gat No. 494<br>On or towards East : Gat No. 496 & 39<br>On or towards West : Gat No. 492 |

Alibag.
Dated: __ day of October, 2024
For Zunjarrao & Co.
**Sd/-**
**Vikrant Zunjarrao**

निवडक

## टॉम लॅथम भारावला

**पुणे :** न्यूझीलंडने ६९ वर्षांनंतर पहिली कसोटी मालिका जिंकली. या ऐतिहासिक कामगिरीनंतर किवी संघाचा कर्णधार टॉम लॅथम खूपच आनंदी दिसत होता. लॅथमने टीम इंडियाविरुद्धची मालिका २-० ने जिंकल्यानंतर या विजयाचे श्रेय खास खेळाडूला दिले. न्यूझीलंड संघाचा कर्णधार टॉम लॅथमने मालिका जिंकण्याचे श्रेय मिचेल सँटनरला दिले. या फिरकीपटूने पहिल्या डावात सात आणि दुसऱ्या डावात सहा, अशा एकूण १३ विकेट्स घेत न्यूझीलंडच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

## पाक बोर्डाचा खेळाडूंना धक्का

**नवी दिल्ली :** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने २०२४-२५ आंतरराष्ट्रीय हंगामासाठी आपला केंद्रीय करार जाहीर केला आहे. पीसीबीने प्रथमच पाच नवीन खेळाडूंचा केंद्रीय करारात समावेश केला आहे. हसन अली, सर्फराज अहमद आणि फखर जमान या स्टार खेळाडूंचा पीसीबीच्या केंद्रीय करारात समावेश करण्यात आलेला नाही. दुसरीकडे, गेल्या वर्षी शाहीन आफ्रिदीचा अ श्रेणीमध्ये समावेश करण्यात आला होता. यावेळी त्याला ब श्रेणीत ठेवण्यात आले आहे. शादाब खानलाही क श्रेणीत ठेवण्यात आले आहे.

## इशानचे वडील जेडीयूत जाणार

**पाटणा :** भारतीय संघाचा प्रसिद्ध क्रिकेटपटू ईशान किशनचे वडील प्रणव कुमार पांडे उर्फ चुन्नू जनता दल युनायटेडमध्ये सामील होणार आहेत. पाटणा येथील जेडीयू कार्यालयात ते हजारो समर्थकांसह पक्षाचे सदस्यत्व घेणार आहेत. पाटणा येथील प्रदेश कार्यालयात जेडीयूच्या पुनर्मिलन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमात ते जेडीयूचे सदस्यत्व घेणार आहेत. प्रणव कुमार पांडे यांची आई सावित्री शर्मा या नवाडा येथील सुप्रसिद्ध महिला डॉक्टर आहेत.

## शामीने मागितली माफी

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी जिंकण्यावर आहे. भारताने जाहीर केलेल्या १८ सदस्यीय संघात वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला संधी देण्यात आलेली नाही. संघ जाहीर होण्यापूर्वी शमी दुखापतीनंतर तब्बल वर्षभरानंतर पुनरागमन करण्यात यशस्वी होईल, अशी अपेक्षा होती. पण शमीची दुखापत काही पूर्णपणे बरी झालेली नाही. आता भारतीय संघात निवड न झाल्याने शमीने माफी मागत एक पोस्ट शेअर केली आहे.शमीने त्याच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे.

## विराटने गमावला संयम

**पुणे :** भारताचा माजी कर्णधार आणि रन मशीन विराट कोहली पुन्हा एकदा त्याच्या खराब फॉर्मशी झुंजत आहे. दुसऱ्या कसोटीत विराट कोहली पूर्णपणे फ्लॉप ठरला. दुसऱ्या डावात बाद झाल्यानंतर त्याने अस काही केलं की, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.या व्हिडिओमध्ये कोहली दुसऱ्या डावात बाद झाल्यानंतर ड्रेसिंग रूममध्ये परतताना दिसत आहे. यावेळी त्याने रागाच्या भरात आईस बॉक्सवर बॅट मारली. विराट कोहली स्वतःवर रागावलेला दिसत होता.

# भारतीय संघासाठी बीसीसीआयने काढलं फर्मान

## प्रत्येक खेळाडूला करावा लागणार सराव



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**भारतीय संघाता तब्बल १२ वर्षांनंतर घरच्या भूमीवर कसोटी मालिकेत पराभवाला सामोरे जावे लागले आहे. पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात टीम इंडियाचा ११३ धावांनी पराभव झाला. यासह तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील सलग दोन सामने न्यूझीलंडने जिंकत मालिकेत २-० अशी आघाडी मिळवली आहे. भारताच्या या मालिका पराभवानंतर काही तासांनंतर भारतीय संघ व्यवस्थापनाने एक फर्मान काढलं आहे.**

भारतीय संघ व्यवस्थापनाने न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी मुंबईत कोणतेही पर्यायी सराव सत्र नसल्याची माहिती सर्व खेळाडूंना देण्यात आली आहे. १ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या तिसऱ्या कसोटीपूर्वी सर्वच खेळाडूंना दोन सराव सत्रांमध्ये भाग घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

एका सूत्राने सांगितले की, ''संघ व्यवस्थापनाने खेळाडूंना ३० आणि ३१ ऑक्टोबरला दोन दिवस सरावासाठी उपस्थित राहण्यास सांगितले आहे. हे अनिवार्य आहे आणि कोणीही हे सराव सत्र वगळू शकत नाही.

भारतीय संघ आपल्या खेळाडूंना सामन्याच्या एक दिवस आधी नेटवर न येण्याची परवानगी देत आले आहे, जेणेकरून ते पाच दिवसीय सामन्यापूर्वी मानसिकरित्या तयार होऊ शकतील. मात्र, या मालिकेतील पराभवाचे पडसाद आता उमटू लागले आहेत.

सहसा, वेगवान गोलंदाज आणि अव्वल खेळाडू सराव सत्रात सहभागी होत नाहीत किंवा कसोटी सामन्यापूर्वी साधारण ट्रेनिंग करता. गेल्या काही काळापासून ही एक सामान्य प्रथा आहे, विशेषतः क्रिकेटपटूंच्या वर्कलोड मॅनेजमेंटचा मुद्दा लक्षात घेता संघ व्यवस्थापन सराव सत्राला सूट देते.

खेळाडूंना पुन्हा रिकव्हर होण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळू शकेल, यासाठीही सूट दिली जाते. पण जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरण्यासाठी हा सामना जिंकणे आवश्यक असणार आहे, त्यामुळे संपूर्ण संघ सराव सत्रात सहभागी होईल, जिथे खेळाडू कठोर सराव करतील. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी सध्या सुरू असलेली मालिका ०-३ ने गमावणं भारताला परवडणारं नाही.

दरम्यान, भारतीय कसोटी कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि केएल राहुल त्यांच्या कुटुंबियांबरोबर वेळ घालवण्यासाठी मुंबईत पोहोचले आहेत, तर बहुतांश भारतीय खेळाडू २७ तारखेला सपोर्ट स्टाफसह मुंबईला पोहोचतील.

# टीम इंडियावर आली 'गंभीर' वेळ



**। पुणे । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडच्या संघाने दुसरा कसोटी सामना जिंकत तीन सामन्यांची कसोटी मालिका २-० अशी खिशात घातलीये. पुण्याच्या मैदानात रंगलेल्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडच्या संघाने तिसऱ्या दिवशीच ११३ धावांनी विजय मिळवत ऐतिहासिक मालिका विजयाची नोंद केली. याआधी बंगळुरु कसोटी सामन्यात न्यूझीलंडनं ८ विकेट्सनी विजय मिळवला होता.

गौतम गंभीर याने प्रशिक्षक पदाचा कारभार हाती घेतल्यानंतर टीम इंडियाची ही दुसरी कसोटी मालिका होती. या कसोटी मालिकेत जवळपास १२ वर्षांनी टीम इंडियावर मायदेशात कसोटी मालिका गमावण्याची नामुष्की ओढावली. यासह गौतम गंभीरसोबत कमालीचा योगायोग जुळून आला. हा योग गंभीरचं नशीबच निघालं फुटकं, असा सीन निर्माण करणारा आहे.

याआधी भारतीय संघाने २०१२-१३ मध्ये मायदेशात कसोटी मालिका गमावली होती. योगायोग हा की, त्यावेळीही गौतम गंभीर हा टीम इंडियाचा भाग होता. फरक फक्त एवढाच की, आज तो टीम इंडियाचा कोच आहे अन् त्यावेळी तो खेळाडूच्या रुपात संघात दिसला होता. १२ वर्षांपूर्वी भारतीय संघाने इंग्लंड विरुद्धची ४ सामन्यांची कसोटी मालिका २-१ अशा फरकाने गमावली होती. गौतम गंभीरशिवाय विराट कोहली आणि आर अश्विनही मालिका गमावणाऱ्या संघाचा भाग होते.

हॅन्सी क्रोनिएच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेच्या संघाने भारतीय संघाला घरच्या मैदानात रंगलेल्या २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० अशी मात दिली होती. त्यानंतर २००४ मध्ये ऑस्ट्रेलियन संघाकडून टीम इंडियावर २-१ अशा पराभवाची नामुष्की ओढावली होती. या मालिकेत काही सामन्यात रिकी पॉंटिंग तर काही सामन्यात ॲडम गिलख्रिस्ट कांगारू संघाच्या कॅप्टन्सीची धूरा सांभाळताना दिसून आले होते. २०१२मध्ये ॲलेस्टर कुकच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाने टीम इंडियाला २-१ अशी मात दिल्यानंतर १२ वर्षांनी टॉम लॅथमच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघासमोर टीम इंडियावर घरच्या मैदानात मालिका गमावण्याची नामुष्की आली.

# मनू भाकरची चाहत्यांनी उडवली खिल्ली



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये दोन कांस्य पदकांची कमाई करणारी मनू भाकर. मनूने या ऐतिहासिक कामगिरीसह प्रसिद्धी मिळवली. तेव्हापासून तिला अनेक कार्यक्रमांमध्ये आमंत्रित करण्यात आले. विविध फोटो, व्हिडीओ पोस्ट करुन ऑलिम्पिकपटू चर्चेत राहत असते. आता मनूने एक अनोखी पोस्ट करुन सर्वांचे लक्ष वेधले, मात्र काही वेळातच तिला आपली पोस्ट डिलीट करावी लागली. मला सांगा, मी ध्यानचंद खेल रत्न पुरस्कारासाठी पात्र आहे का? धन्यवाद, असे मनू भाकरने एक पोस्ट करत म्हटले. याशिवाय तिने पुरस्कार, खेलरत्न आणि ऑलिम्पिक्स असे काही हॅशटॅगदेखील वापरले. पण, काही वेळातच मनूने ही पोस्ट डिलीट केली.

खरे तर नेटकऱ्यांनी मनू भाकरला संबंधित पोस्टवरुन ट्रोल केल्याने तिला पोस्ट डिलीट करावी लागली. सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांनी मनूची खिल्ली उडवली.

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारताला मनू भाकरने पहिले पदक मिळवून दिले. १० मी. महिलांच्या पिस्तूल प्रकारात तिने कांस्य पदक पटकावले. मनू भाकरने सरबजोत सिंगच्या साथीने कांस्य पदक जिंकून एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू बनण्याचा मान पटकावला. मनू आणि सरबजोतने शूटींगच्या १० मीटर एअर पिस्तूल मिश्र प्रकारात कांस्य पदकावर निशाणा साधला.२५ मीटर महिलांच्या पिस्तूल प्रकारात पदक जिंकून मनूने पदकाची हॅटट्रिक मारली.

# रोहित-विराटला दाखवला नेटकऱ्यांनी 'आरसा'



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

घरच्या मैदानात मागील १२ वर्षांत सलग १८ मालिका विजयासह दिमाखदार रेकॉर्ड नावे घेऊन मिरवणाऱ्या टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. न्यूझीलंडच्या संघाने बंगळुरु पाठोपाठ पुण्याचं मैदान मारत भारतीय भूमित पहिली वहिली कसोटी मालिका जिंकली. मायदेशातील भारताचा विजयी रथ पाहुण्या संघाने रोखला.

टीम इंडियाची आण बाण आणि शान असलेल्या रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनाही लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही. भारतीय संघाच्या लाजिरवाण्या पराभवानंतर आता बॅटिंगच्या मुद्यावरून या दोघांना सोशल मीडियावर ट्रोल करण्यात येत आहे. क्रिकेटचा देव अर्थात सचिन तेंडुलकरचा दाखला देत नेटकऱ्यांनी विराट कोहली आणि रोहित शर्माची शाळा घेतली आहे.

न्यूझीलंड विरुद्धच्या पुण्यातील कसोटी सामन्यात विराट कोहली दोन्ही डावात फिरकीपटू मिचल सँटनरच्या जाळ्यात फसला. पहिल्या डावात तर तो फुलटॉस चेंडूवर बोल्ड झाला. विराट कोहलीची नेहमीच तेंडुलकरसोबत तुलना केली जाते. एका नेटकऱ्याने मिचल सँटनर विरुद्ध कोहलीचा फ्लॉप शो आणि दिवंगत आणि महान फिरकीपटू शेन वॉर्न विरुद्धचा सचिन तेंडुलकरचा हिट शो दाखवणारा व्हिडिओ शेअर करत यापुढे चुकूनही विराटची तुलना सचिनशी करु नका, असे मत व्यक्त केल्याचे दिसून येते.

# एव्हिन लुईसने कुटल्या नाबाद १०२ धावा



**। पल्लेकेले । वृत्तसंस्था ।**

तीन वर्षांनंतर राष्ट्रीय संघासाठी वन डे मॅच खेळणाऱ्या एव्हिन लुईसने तिसऱ्या सामन्यात श्रीलंकेची धुलाई केली. त्याने ६१ चेंडूत १०२ धावांची नाबाद खेळी करताना चार षटकार आणि नऊ चौकार लगावले.

लुईसच्या शतकाला साथ मिळाली ती शेरफेन रुदरफोर्डच्या २६ चेंडूत ५० धावांची. श्रीलंकेने २३ षटकांत ३ बाद १५६ धावा केल्या होत्या, परंतु नियमानुसार वेस्ट इंडिजसमोर १९५ धावांचे सुधारित लक्ष्य ठेवण्यात आले. श्रीलंकेने ब्रँडन किंग आणि शेई होप यांना स्वस्तात माघारी पाठवले. पण, लुईस आणि किंगने एक षटक आणि ८ विकेट्स राखून संघाला विजय मिळवून दिला.

श्रीलंकेची सुरुवात संथ झाली होती. सलामीवीर अविष्का फर्नांडो आणि पाथुम निसांका यांनी पहिल्या १० षटकांत बिनबाद ४७ धावा जोडल्या होत्या.पावसाची शक्यता असतानाही या दोन सलामीवीरांनी संथ खेळ सुरूच ठेवला. त्यांनी १७ षटकांत ८१ धावाच फलकावल चढवल्या होत्या. १८व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर फर्नांडोला रोस्टन चेसने माघारी पाठवले. त्यानंतर पाऊस आल्याने खेळाडूंना मैदान सोडावे लागले. बराच वेळ पाऊस पडल्यानंतर सामना पुन्हा सुरू झाला.

# न्यूझीलंडच्या अष्टपैलू खेळाडूची मालिकेतून माघार



**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडचा महिला संघ अहमदाबाद येथे दुसरा वनडे सामना जिंकून मालिकेत १-१ अशी बरोबरी मिळवण्यासाठी सज्ज झाला आहे. भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यातल्या महिला संघांचा दुसरा वन डे सामना अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे..मात्र, आजच्या लढतीपूर्वी न्यूझीलंडची अष्टपैलू खेळाडू ॲमेलिया केर हिला क्वाड्रिसेपच्या दुखापतीमुळे भारताविरुद्धच्या उर्वरित वनडे सामन्यांना मुकणार आहे.

अहमदाबादमधील पहिल्या सामन्यात केरच्या डाव्या क्वाड्रिसिप स्नायूला दुखापत झाली होती. पहिल्या वन डेत तिने चार विकेट्स घेतल्या आणि २५ धावा केल्या होत्या. पण, भारताने हा सामना ५९ धावांनी जिंकला होता.सामन्याच्या दुसऱ्या दिवशी केरला स्कॅनसाठी रुग्णालयात नेण्यात आले, ज्यामध्ये क्वाड्रिसेप फाटल्याची पुष्टी झाली आणि त्यामुळे तिला बरे होण्यासाठी अंदाजे तीन आठवडे लागतील.

मुख्य प्रशिक्षक बेन सॉयर यांनी सांगितले की, आम्ही मेलीसाठी खरोखर निराश झालो आहोत. दुखापत होणे ही खेळाडूसाठी नेहमीच आव्हानात्मक वेळ असते आणि आम्हाला माहित आहे की ती हे सामना खेळू न शकल्याने किती निराश आहे.मेली या संघाचा अविभाज्य भाग आहे.

## सनथ जयसूर्याकडे मुख्यप्रशिक्षक पदाची जबाबदारीचा परिणाम

# श्रीलंका क्रिकेट संघाचे नशिब पालटले



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सनथ जयसूर्या याची गणना क्रिकेट जगतातील महान खेळाडूंमध्ये केली जाते. जयसूर्याने २२ वर्षांच्या कारकिर्दीत श्रीलंकेसाठी अनेक मॅच-विनिंग परफॉर्मन्स दिले. १९९६ चा विश्वचषक जिंकणाऱ्या श्रीलंकेच्या संघाचा भाग असलेल्या जयसूर्याने आपल्या स्फोटक फलंदाजीने सलामीची व्याख्याच बदलून टाकली. त्या विश्वचषकात जयसूर्या आणि रोमेश कलुवितरणाची झंझावाती फलंदाजी चाहते कधीही विसरू शकत नाहीत.

आता सनथ जयसूर्या प्रशिक्षक म्हणून आपला ठसा उमटवत आहे. यंदाच्या टी-२० विश्वचषकानंतर जयसूर्याची श्रीलंकेच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली होती. प्रशिक्षक म्हणून जयसूर्याने आपल्या संघाचे नशीब बदलले आहे. जयसूर्याच्या कोचिंगखाली श्रीलंकेचा संघ चमकदार खेळ करत आहे. काही दिवसांपूर्वीच श्रीलंकेने तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत वेस्ट इंडिजचा २-१ असा पराभव केला होता. त्याआधी घरच्या कसोटी मालिकेत न्यूझीलंडचा २-० असा पराभव केला होता. पाहिलं तर १५ वर्षांनंतर श्रीलंकेने न्यूझीलंडला कसोटी मालिकेत पराभूत केले.

सनथ जयसूर्या यांच्या प्रशिक्षणाखाली श्रीलंकेने तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत भारताचा २-० असा पराभव केला. भारताविरुद्ध श्रीलंकेचा हा विजय संस्मरणीय ठरला. श्रीलंकेने २७ वर्षांनंतर मायदेशात द्विपक्षीय वनडे मालिकेत भारताचा पराभव केला. यापूर्वी ऑगस्ट १९९७ मध्ये अर्जुन रणतुंगाच्या नेतृत्वाखालील श्रीलंकेच्या संघाने सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा पराभव केला होता. एवढेच नाही तर जयसूर्याच्या मार्गदर्शनाखाली श्रीलंकेने यावर्षी ओव्हल कसोटी सामन्यात इंग्लंडचा ८ गडी राखून पराभव केला, हा संघाचा १० वर्षांतील ब्रिटिशांविरुद्धचा पहिला कसोटी विजय होता.कुमार संगकारा, महेला जयवर्धने, तिलकरत्ने दिलशान, रंगना हेराथ यांसारख्या दिग्गज खेळाडूंच्या निवृत्तीमुळे संघाच्या कामगिरीत घसरण झाली आणि २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात ते केवळ दोनच सामने जिंकू शकले ते करा त्यानंतर २०२४ च्या टी-२० विश्वचषकातही श्रीलंकेच्या संघाची कामगिरी मध्यम स्वरूपाची होती. त्यानंतर तिला ग्रुप स्टेजच्या पलीकडे प्रगती करता आली नाही. आता श्रीलंकेच्या संघाला जसुर्याच्या कोचिंगमध्ये संजीवनी मिळाली आहे.

### जयसूर्याचा आंतरराष्ट्रीय विक्रम असा होता

**५५ वर्षीय सनथ जयसूर्याने २०११ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला. जयसूर्याने श्रीलंकेसाठी ११० कसोटी सामन्यांमध्ये ६,९७३ धावा केल्या, ज्यात १४ शतके आणि ३१ अर्धशतकांचा समावेश आहे. तर ४४५ एकदिवसीय सामन्यांमध्ये जयसूर्याच्या नावावर ३२.३६ च्या सरासरीने १३,४३० धावांची नोंद आहे. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये जयसूर्याने २८ शतके आणि ६८ अर्धशतके केली आहेत. जयसूर्याने श्रीलंकेसाठी ३१ टी-२० सामन्यांमध्येही भाग घेतला, ज्यामध्ये त्याने ६२९ धावा केल्या. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये जयसूर्याने गोलंदाजीतही कहर केला आणि एकूण ४४० विकेट घेतल्या.**



# भारतीय संघ १० नोव्हेंबरला ऑस्ट्रेलियाला होणार रवाना

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रोहित शर्मा आणि कंपनी पुढील महिन्यात बॉर्डर-गावस्कर स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहेत. २२ नोव्हेंबरपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाच्या प्रस्थानाची तारीख जाहीर झाली आहे. टीम इंडिया १० नोव्हेंबरला ऑस्ट्रेलियाला रवाना होणार आहे.

भारतीय संघ पुढील महिन्याच्या १० तारखेला बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियाला रवाना होणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ जानेवारीच्या सुरुवातीपर्यंत ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असेल. जिथे दोन्ही संघांमध्ये ५ सामन्यांची दीर्घ कसोटी मालिका खेळवली जाणार आहे.

कांगारूंच्या भूमीवर पोहोचल्यानंतर भारताला १५ नोव्हेंबरला सराव सामना खेळायचा आहे. हा सामना १५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान भारत अ विरुद्ध होणार आहे. यानंतर २२ नोव्हेंबरपासून दोन्ही संघांमधील कसोटी मालिका सुरू होणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)